रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक १७५
www.ramprahar.com

◆ रविवार, ११ जानेवारी २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

नवी मुंबई मनपा निवडणुकीत भाजपच्या सभांचा धडाका/२

रविप्रहरमध्ये विविध विषयांवरील लेख/४

भारत वि. न्यूझीलंड आज पहिली वनडे रंगणार/८

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उद्या कळंबोलीत साधणार संवाद



**पनवेल :** येथील महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीत भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाइं महायुतीने प्रचारामध्ये जोरदार आघाडी घेतली असून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सोमवारी (दि. १२) दुपारी ३ वाजता कळंबोली येथे आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात संवाद साधत व्हिजन मांडणार आहेत. पनवेल मनपा मैदान, भूमी गार्डेनियासमोर, सेक्टर १९, प्लॉट सी/२ कळंबोली या ठिकाणी हा कार्यक्रम होणार आहे. पनवेल महापालिका निवडणुकीत भाजपचे सहा अधिकृत उमेदवार बिनविरोध विजयी झाले आहेत. इतर ठिकाणीही महायुतीला मतदारांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस कळंबोलीत येणार असल्याने कार्यकर्त्यांमध्ये उत्साह पसरला आहे. या कार्यक्रमाचे निवेदन सिने अभिनेते प्रसाद ओक आणि सिने अभिनेत्री अमृता खानविलकर करणार आहेत.

# विरोधकांकडे विकासाचे व्हिजन नाही

### ■ आमदार प्रशांत ठाकूर यांचा हल्लाबोल; प्रभाग १४मध्ये महायुतीची रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजप महायुती केवळ आणि केवळ विकासाचा मुद्दा घेऊन निवडणुकीला सामोरी जात आहे. दुसरीकडे विरोधकांकडे शहराच्या विकासासाठी कोणतेही व्हिजन नसून महायुतीला हरवणे हे एकमेव उद्दिष्ट ठेवून ते राजकारण करत आहेत, परंतु आम्ही केलेल्या विकासकामांची पावती जनताच देईल आणि या जोरावर महायुती पनवेल महापालिका निवडणुकीत मोठे यश संपादन करेल, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी प्रभाग १४मध्ये प्रचारावेळी व्यक्त केला.



पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक १४मधील महायुतीचे उमेदवार इक्बाल हुसेन काझी, सारिका अतुल भगत, सतीश दत्तात्रेय पाटील आणि रेणुका मयुरेश नेतकर यांच्या प्रचारासाठी शनिवारी (दि.१०) भव्य प्रचार रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी मतदारांशी संवाद साधताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी विरोधकांच्या नकारात्मक राजकारणावर जोरदार टीका केली.

महायुतीचा प्रत्येक उमेदवार हा सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांची जाण असलेला असून विकासाचा हा रथ पुढे नेण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी ठामपणे सांगितले.

या प्रचारावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी पंचायत समिती सदस्य रत्नप्रभा घरत, माजी नगरसेवक मुकीत काझी, माजी नगरसेविका सिद्धिका पुंजानी, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, सय्यद अकबर, वर्षा ठाकूर, स्वाती कोळी, जवाद काझी, समिना साठी, मोहम्मद साठी यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## धारावीकरांना हक्काचे घर देणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई महापालिका निवडणुकीच्या रणधुमाळीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.१०) धारावी येथील जाहीर सभेत पुनर्विकासाबाबत पसरवल्या जाणाऱ्या अफवांचा समाचार घेत धारावीकरांना हक्काच्या घराचे आश्वासन दिले. धारावी ही कुणा खासगी व्यक्तीला दिलेली नसून ती सरकारचीच आहे, असे स्पष्ट करत त्यांनी पुनर्विकासाचा रोडमॅप मांडला.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, धारावीच्या पुनर्विकासाबाबत अनेक वर्षांपासून फक्त चर्चाच सुरू होत्या. राजीव गांधी पंतप्रधान असतानाही ही चर्चा झाली, मात्र त्यानंतर ३० वर्ष काहीच घडले नाही, पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार आणि राज्यात महायुती सरकार आल्यावर आम्ही प्रत्यक्ष निर्णय घेतला.

धारावीतील प्रत्येक पात्र व्यक्तीला धारावीतच हक्काचे घर मिळेल. यामधील सर्वात लहान घर ३०० चौरस फुटांचे नसून ते ३५० चौरस फुटांचे असेल, असा मोठा निर्णय सरकारने घेतला असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

धारावीची ओळख तिथल्या लघु उद्योगांमुळे आहे. रहिवासी एका ठिकाणी आणि व्यवसाय दुसरीकडे असे चित्र आम्हाला नको आहे. त्यामुळे धारावीतील सर्व व्यवसाय याच ठिकाणी राहतील आणि त्यांना चांगल्या सुविधा दिल्या जातील. विशेष म्हणजे पुनर्विकास झाल्यानंतर येथील व्यवसायांना पुढील पाच वर्ष राज्य सरकारचे सर्व कर माफ केले जातील, अशी महत्त्वाची घोषणा मुख्यमंत्र्यांनी या वेळी केली.

जे लोक जमीन विकल्याच्या कंड्या पिकवत आहेत त्यांनी स्वतःच्या सत्ताकाळात काय केले, असा सवाल मुख्यमंत्र्यांनी केला. निवडणुकीनंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते या प्रकल्पाचे भूमिपूजन करून प्रत्येक धारावीकराचे आयुष्य बदलू, असेही त्यांनी जाहीर केले.

## जाहीरनाम्यांची लगबग

**पुणे : प्रतिनिधी**

राज्यातील महानगरपालिका निवडणुकीच्या मतदानाला आता अवघे काहीच दिवस उरल्याने सर्व राजकीय पक्षांची जाहीरनाम्यासाठी लगबग वाढल्याचे दिसून येते. आपण भविष्यात काय करणार आहोत याबाबतची आश्वासने जाहीरनाम्यातून देण्यात येत आहेत.

पुणे महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा संयुक्त जाहीरनामा शनिवारी (दि. १०) प्रसिद्ध करण्यात आला आहे. या वेळी राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी पक्षाकडून पुणेकरांना मोफत मेट्रो आणि मोफत बससेवेचे आश्वासन दिले. त्यांच्यासमवेत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या नेत्या खासदार सुप्रिया सुळे, खासदार अमोल कोल्हे आदी उपस्थित होते.

दरम्यान, सर्वांचे लक्ष लागून राहिलेल्या मुंबई महापालिकेसाठी भाजप, शिवसेना, रिपाइं महायुतीचा जाहीरनामा रविवारी (दि. ११) प्रसिद्ध होणार आहे. यामध्ये मुंबईकरांच्या पायाभूत सुविधांसाठी महायुती कोणत्या घोषणा करणार हे पाहणे महत्त्वाचे असेल.

# तळोजा परिसरात महायुतीचा जोरदार प्रचार

### लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे यांची उपस्थिती

**तळोजा : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीचा प्रचार आता शिगेला पोहचला असून भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी आणि आरपीआय महायुतीने आपली पूर्ण ताकद मैदानात उतरवली आहे. प्रभाग क्रमांक ३मधील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ तळोजा परिसरातील तळोजा पाचनंद, ओवेसह मुर्बी येथे शक्तिप्रदर्शन करण्यात आले. या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महायुतीच्या विजयाचा ठाम निर्धार व्यक्त केला.





महायुतीचे प्रभाग ३मधील उमेदवार निर्दोष केणी, विनोद घरत, मंजुळा कातकरी आणि प्रिती फुलाजी ठाकूर यांच्या समर्थनासाठी काढण्यात आलेल्या रॅलीला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. ठिकठिकाणी उमेदवारांचे स्वागत करण्यात आले. या रॅलीत भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, माजी नगरसेवक पापा पटेल यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, भाजपच्या माध्यमातून परिसरात झालेल्या विकासकामांच्या जोरावर मतदारांचा आम्हाला उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून प्रभाग ३मध्ये महायुतीचा विजय १० हजारांहून अधिक मताधिक्क्याने होईल, असा विश्वास व्यक्त केला तसेच तळोजा परिसराची शान आणि विकास अधिक उंचावण्यासाठी महायुती कटिबद्ध असल्याचेही सांगितले.

## निवडक

### ओडिशामध्ये विमान कोसळून पायलटसह सहा जण जखमी

**भुवनेश्वर :** ओडिशामध्ये शनिवारी (दि. १०) दुपारी एका चार्टड विमानात तांत्रिक बिघाड आढळून आल्यानंतर राउरकेला हवाई धावपट्टीपासून सुमारे नऊ किमी अंतरावर शेतात क्रॅश लँडिंग झाले. या अपघातात पायलटसह सहा जण गंभीर जखमी झाल्याची माहिती मिळत आहे. इंडियावन एअरचे हे विमान राउरकेला ते भुवनेश्वर असा प्रवास करत होते. तांत्रिक बिघाडामुळे जवळच्या शेतात ते उतरवण्याचा अयशस्वी प्रयत्न पायलटकडून झाला. दुर्घटनेतील जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारीपासून

**नवी दिल्ली :** संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन २८ जानेवारी ते २ एप्रिलदरम्यान होणार आहे. संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांनी ही माहिती दिली. या अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारी रोजी संपेल आणि दुसरा टप्पा ९ मार्च रोजी सुरू होईल. हे अधिवेशन म्हणजे अर्थपूर्ण चर्चा आणि नागरिक-केंद्रित प्रशासनाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल असल्याचे रिजिजू यांनी सांगितले.

## आरपीआयच्या नऊ जणांचे सहा वर्षांसाठी निलंबन



### पक्षविरोधी काम : सात जणांना कारणे दाखवा नोटीस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूक पक्षाचा आदेश न मानणे, पक्षविरोधी कारवाया करणे, पक्षशिस्त मोडणे, संघटनात्मक कामकाजास बाधा निर्माण करणे, निवडणूक प्रक्रियेत पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात प्रचार करणे, पत्रकार परिषद घेऊन जिल्हा अध्यक्षांविषयी आक्षेपार्ह विधाने करणे तसेच पक्षाच्या अधिकृत भूमिकेच्या विरोधात भूमिका घेणे या गंभीर कारणांमुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष तथा पनवेल महापालिका निवडणुकीसाठी नियुक्त निरीक्षक व प्रभारी नरेंद्र गायकवाड यांनी नऊ पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे पुढील सहा वर्षांसाठी निलंबन केले आहे.

नरेंद्र गायकवाड म्हणाले की, पक्ष संघटना मजबूत ठेवणे, कार्यकर्त्यांमध्ये शिस्त व एकात्मता राखणे तसेच जनतेसमोर पक्षाची सकारात्मक प्रतिमा कायम ठेवणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. निलंबनाच्या कालावधीत संबंधित व्यक्तींना कोणतेही पक्षीय पद अथवा जबाबदारी राहणार नाही तसेच सात जणांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे.

मोहनिश गायकवाड (प्रभारी, पनवेल महानगर क्षेत्र), प्रभू जाधव (खारघर), विजय गायकवाड (तळोजा), प्रवीण जाधव (पनवेल), शरद पाटील (जिल्हा उपाध्यक्ष), नवीन सोनावणे (कळंबोली). राजू इंगळे (खांदा कॉलनी), संतोष सोनकांबळे (खारघर), सूरज कदम (कळंबोली) यांचे निलंबन करण्यात आले आहे, तर पक्षविरोधी भूमिका घेतल्याच्या कारणावरून हिरामण गायकवाड, विजय पवार (तालुका अध्यक्ष, पनवेल), सुनील सप्रे, जयप्रकाश पवार, जीवक गायकवाड, अशोक गोतारणे, नितीन मोरे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून ही नोटीस प्राप्त झाल्यापासून चार दिवसांच्या आत लेखी खुलासा न केल्यास पक्षातर्फे त्यांच्यावरही निलंबनाची कारवाई करण्यात येईल, असेही रिपाइंचे जिल्हाध्यक्ष तथा महापालिका निरीक्षक व प्रभारी नरेंद्र गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

## फ्रिजच्या स्फोटात तीन जणांचा मृत्यू

**मुंबई : प्रतिनिधी**

घरात असलेल्या फ्रिजचा अचानक स्फोट झाल्याने लागलेल्या आगीत वडील आणि त्यांच्या दोन मुलांचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. १०) पहाटे ९च्या सुमारास गोरेगाव येथे घडली.

गोरेगाव पश्चिमेकडील भगतसिंग नगरमध्ये पावस्कर कुटुंब गाढ झोपेत असताना अचानक घरातील फ्रिजचा मोठा स्फोट झाला आणि काही क्षणांतच घराला आगीने वेढले. घराला प्लास्टिक शीट लावलेली असल्याने आगीचा भडका अधिकच उडाला. या आगीत वडील संजोग पावस्कर (वय ४८) आणि त्यांची दोन मुले हर्षदा पावस्कर (वय १९) आणि कुशल पावस्कर (वय १२) यांचा मृत्यू झाला. घरातील महिला रात्रपाळीसाठी कामावर गेल्याने बचावली, मात्र एका रात्रीत आपले संपूर्ण कुटुंब गमावल्याने त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

## कडाक्याच्या थंडीने घेतला पहिला बळी

### निफाडमध्ये तरुणाचा मृत्यू

**नाशिक : प्रतिनिधी**



निफाड तालुक्यात कडाक्याच्या थंडीने पहिला बळी घेतल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. देवगाव (ता. निफाड) येथील २२ वर्षीय तरुणाचा अतिथंडीमुळे मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

देवगाव येथील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाजवळ शुक्रवारी सकाळी सुमारे आठच्या सुमारास समीर दौलत सोनवणे (वय २२) हा तरुण मृतावस्थेत आढळून आला. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालानुसार अतिथंडीमुळे हृदयविकाराचा तीव्र झटका येऊन तरुणाचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

निफाड तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून तापमानात लक्षणीय घट झाली असून शुक्रवारी निफाड गहू कृषी संशोधन केंद्रात किमान तापमान ६.१ अंश सेल्सिअस नोंदवण्यात आले. याआधी गुरुवारी प्रथमच ५.९ अंश सेल्सिअस इतके नीचांकी तापमान नोंदले गेले होते. रात्री प्रचंड गारठा जाणवत असल्याने रस्त्यांवरील वर्दळही मोठ्या प्रमाणात कमी झाल्याचे चित्र होते.

दरम्यान, वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विशेषतः रात्रीच्या वेळी योग्य ती काळजी घ्यावी, उबदार कपडे वापरावेत, असे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी केले आहे.

## किल्ले रायगडावरील महादरवाजाच्या तटबंदीचे जतन-संवर्धन

### ऐतिहासिक वारशाच्या संरक्षण कामाला सुरुवात

**महाड : रामप्रहर वृत्त**

रायगड प्राधिकरणामार्फत किल्ले रायगड येथे सुरू असलेल्या तलावाच्या कामानंतर आता महत्त्वाच्या तटबंदीच्या जतन कामास सुरुवात करण्यात आली आहे. रायगड प्राधिकरणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी ही माहिती दिली.

स्वराजाची राजधानी असणाऱ्या दुर्गराज रायगडचा अत्यंत महत्त्वाचा भाग असलेल्या महादरवाजालगतच्या तटबंदीचे जतन व संवर्धनाचे काम रायगड विकास प्राधिकरणाच्या माध्यमातून सुरू करण्यात आले आहे. यात महादरवाजापासून टकमक टोकापर्यंतच्या तटबंदीचा समावेश आहे.



पुरातत्व विभागाच्या मंजुरीने सुरू असलेल्या या कामांपैकी महादरवाजा ते हिरकणी बुरूजादरम्यानच्या तटबंदीचे जतन-संवर्धनाचे काम नुकतेच पूर्ण झाले आहे. सध्या संपूर्ण परिसराचे प्रथम सखोल दस्तऐवजीकरण करण्यात आले असून त्यात निदर्शनास आलेल्या बाबींनुसार पुढील कामे सुरू करण्यात आली आहेत.

तटबंदीच्या भिंतींवर साचलेला मातीचा व ढिगाऱ्याचा थर काढणे (डेब्रिस क्लीअरन्स) तसेच भिंती जलरोधक (वॉटरटाइटिंग) करण्याचे काम सुरू आहे. ही सर्व कामे चुना, बेलफळ, सुर्खी व दगड यांसारख्या पारंपरिक बांधकाम साहित्याचा वापर करून करण्यात येत असून किल्ल्याच्या मूळ बांधकाम शैलीचे जतन केले जात आहे तसेच तटबंदीचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या चिलखती बुरुजावर साचलेला ढिगारा व झाडेझुडपे हटविण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

या प्रक्रियेदरम्यान बुरुजाच्या फ्लोरिंग लेव्हल्स तसेच भिंतींमध्ये असलेली गन पॉईंट्सची अनोखी व वैशिष्ट्यपूर्ण शृंखला उजेडात आली असून त्यांचे लवकरच जतनसंवर्धन करण्यात येणार आहे. या जतन-संवर्धनामुळे पावसाच्या पाण्यामुळे तटबंदीच्या बांधकामाला होणारे नुकसान रोखण्यास मदत होणार आहे. रायगड प्राधिकरणामार्फत सुरू असलेल्या या संवर्धनाबाबत शिवप्रेमी व गडप्रेमींकडून समाधान व्यक्त होत आहे.

## स्नेह मिलन




**पनवेल :** येथील व्यापार मंडळाच्या वतीने स्नेह मिलन कार्यक्रम शुक्रवारी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत बालाजी बॅन्क्वेट हॉलमध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, आमदार विक्रांत पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपिळे, बिनविरोध नगरसेवक अजय बहिरा, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, एस.के. नाईक, महायुतीचे प्रभाग १९मधील उमेदवार राजू सोनी, सुमित झुंझारराव; प्रभाग १४चे उमेदवार इक्बाल हुसेन काझी, सारिका अतुल भगत, सतीश दत्तात्रेय पाटील, रेणुका मयुरेश नेतकर; प्रभाग १८च्या उमेदवार प्रिती जॉर्ज, प्रभाग २०च्या उमेदवार श्वेता बहिरा यांच्यासह व्यापारी बांधव उपस्थित होते.

# भाजपचे काम बोलतेय, म्हणूनच विरोधक वैतागले -मुख्यमंत्री फडणवीस

**पिंपरी : प्रतिनिधी**

भाजपचे काम बोलत आहे, म्हणूनच विरोधक वैतागले आहेत. त्यांच्याकडे सांगण्यासारखे काम नाही, म्हणून वादावादी सुरू आहे. कोणाच्याही टीकेला उत्तर देण्याची गरज नाही; तुम्ही केलेली विकासकामे नागरिकांपर्यंत पोहचवा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्थानिक नेत्यांना दिले, आकुर्डीत शनिवारी (दि. १०) भाजपची विजयी संकल्प सभा झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. आमदार शंकर जगताप, महेश लांडगे, उमा खापरे, अमित गोरखे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे आदी उपस्थित होते.





मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, पिंपरी-चिंचवडमध्ये भाजप पूर्वीपेक्षा जास्त जागा निवडून आणेल. 'जेएनएनयूआरएम'अंतर्गत १५ वर्षे घरांची कामे रखडली. ती निकृष्ट दर्जाची बनविण्यात आली. त्यामुळे तिकडे राहण्यासही लोक गेले नाहीत. मोदी सरकारच्या काळात बोऱ्हाडेवाडी, डुडुळगाव व चऱ्होली येथे पंतप्रधान आवास योजनेतून दर्जेदार घरे दिली. पिंपरी-चिंचवड शहरातील विविध समस्या भाजपच्या काळातच सोडविण्यात आल्या. महापालिका शाळांचा दर्जा सुधारला असून या शाळांमधील प्रवेश दरवर्षी वाढत आहेत.

दिव्यांग भवन, सक्षमा योजना, कचऱ्यावर शंभर टक्के प्रक्रिया, कचऱ्याला 'संपत्ती' म्हणून वापरण्यात देशात महापालिकेचा प्रथम क्रमांक, पर्यावरण कृती आराखडा तयार करणारी पहिली महापालिका अशी भाजपची कामगिरी त्यांनी मांडली. बायोमायनिंग प्रकल्पांनाही आता मागणी वाढत असल्याचे त्यांनी सांगितले.

**शास्तीकर, प्रॉपर्टी कार्डचा विषय मार्गी**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शास्तीकराचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित होता, मात्र एका झटक्यात ३०० कोटी रुपयांचा शास्तीकर माफ केला. प्राधिकरणातील बाधितांचा १२.५ टक्के परतावा व प्रॉपर्टी फ्री होल्डचा प्रश्न मार्गी लावला. यामुळे महापालिकेच्या करात सुमारे ३५० कोटींची भर पडली. रेडझोन, निळ्या-लाल पूररेषेचा प्रश्नही मार्गी लावू.

**'सेफ सिटी'कडे शहराची वाटचाल**

फडणवीस म्हणाले की, शहरात मेट्रोचे जाळे विस्तारले जाणार असून पिंपरी-निगडी मार्गाचे काम सुरू आहे, तर निगडी-चाकण व तिसरा मार्ग लवकरच होणार आहे. त्यामुळे शहराला मेट्रोचा तिसरा मार्ग मिळेल. मुळा-पवना-इंद्रायणीचे संवर्धन, भामा-आसखेड धरणाचे पाणी, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प होत आहेत. स्मार्ट सिटी व अमृत योजनांमुळे राज्याला मोठा निधी मिळाला. दोन हजार सीसीटीव्ही, फायबर ऑप्टिक नेटवर्कमुळे 'सेफ सिटी'कडे वाटचाल सुरू आहे. कमी काळात भाजपने विकास करून दाखवला आहे. लाडक्या बहिणींना 'लखपती दिदी' करू. पुणे-पिंपरी-चिंचवड ही वाढणारी शहरे अधिक मोठी करायची असतील तर महापालिकेत भाजपची सत्ता आवश्यक आहे.

**'एसआरए'बाबत धमक्या देणाऱ्यांचा बंदोबस्त**

शहरातील एक जण झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पांचा (एसआरए) 'बाप' समजतो. त्याला जागेवर आणावे लागले, अशी टीका आमदार महेश लांडगे यांनी व्यासपीठावरून केली. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, येथे कायद्याचे राज्य आहे. मी गृहमंत्री आहे, हे लक्षात ठेवा. एसआरएबाबत कोणी धमक्या देत असेल, तर त्यांच्याकडे पोलिसच बघून घेतील. एसआरएच्या समितीचा मुख्यमंत्री म्हणून मी प्रमुख आहे. जो कोणी धमक्या देईल, त्याच्यावर १६ जानेवारीनंतर योग्य कारवाई केली जाईल.

# नवी मुंबई मनपा निवडणुकीत भाजपच्या सभांचा धडाका

## मंत्री गणेश नाईक यांनी केले मार्गदर्शन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई मनपा निवडणुकीच्या धामधुमीत शनिवारी (दि.१०) प्रभाग क्रमांक १८मध्ये भारतीय जनता पक्षाचे अधिकृत उमेदवार प्रीती संदीप भगत, दयावती संपत शेवाळे, दशरथ सीताराम भगत, निशांत करसन भगत यांच्या प्रचारार्थ आयोजित भव्य जाहीर सभा झाली. या सभेत राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी मार्गदर्शन केले.

विकास, पारदर्शक प्रशासन आणि सर्वसमावेशक प्रगती हेच आमचे ध्येय घेऊन ही सभा नवी मुंबईकरांच्या अपेक्षा पूर्ण करणाऱ्या ठोस संकल्पांसह पार पडली. या जाहीर सभेत शहरातील पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, रस्ते, वाहतूक, आरोग्य, शिक्षण, स्वच्छता, महिला व युवा सशक्तीकरण, रोजगार निर्मिती आणि सुरक्षित नवी मुंबई यावर स्पष्ट रोडमॅप मांडण्यात आला. मागील कार्यकाळात राबवलेल्या विकासकामांचा लेखाजोखा मांडत, येणाऱ्या काळात अधिक





गतिमान, सुरक्षित आणि समृद्ध नवी मुंबई घडवण्याचा निर्धार करण्यात आला.

नवी मुंबईच्या शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आणि सामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी भारतीय जनता पार्टी ठामपणे जनतेसमोर उभी आहे. सर्व मुद्द्यांवर नवी मुंबईला विकासाच्या नव्या उंचीवर नेण्याचा संकल्प भारतीय जनता पक्षाने या जाहीर सभेतून केला आहे.

तत्पूर्वी शुक्रवारी जुईनगर प्रभाग क्रमांक २२मध्ये भारतीय जनता पक्षाचे उमेदवार विजय साळे, डॉ. प्रणाली पाटील, उषा यमगर, काशिनाथ पाटील यांच्या प्रचारार्थ जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

# शिवसेनेचा जाहीरनामा

**नवी मुंबई : बातमीदार**

शिवसेनेने शुक्रवारी (दि.९) नवी मुंबईसाठी जाहीरनामा प्रसिद्ध केला. वाशी येथील कार्यक्रमात प्रसिद्ध करण्यात आलेल्या या जाहीरनाम्यात राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून शहराचा सर्वांगीण विकास साधण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला असून, पायाभूत सुविधा, आरोग्य, पर्यावरण, महिला सक्षमीकरण आणि पारदर्शक प्रशासन या मुद्द्यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

या वेळी झालेल्या पत्रकार परिषदेस खासदार नरेश म्हस्के, शिवसेना नेते विजय नाहटा आणि जिल्हाप्रमुख किशोर पाटील उपस्थित होते.



**पुणे : शिवसेना-भाजप महायुतीला करनी सेनेचे पाठिंबापत्र प्रमुख अजय सिंह सेंगर यांनी खासदार श्रीरंग बारणे यांना दिले. मुंबई, नवी मुंबई, पनवेल, पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका व सर्व निवडणुकीमध्ये हिंदुत्ववादी मतांमध्ये फुट पडू नये म्हणून हा पाठिंबा जाहीर केला आहे.**

# नाईकांसोबत वैर नाहीच -आमदार मंदा म्हात्रे

**नवी मुंबई :** आमदार मंदा म्हात्रे यांनी माध्यमांशी बोलताना वक्तव्य केले की, 'नाईक आणि आमचं वैर नाहीच आहे. वैर आहे ते राजकारणाच्या खुर्चीवरती कोणी बसावं? कोणी किती आपले नगरसेवक काढावं? यासाठी चढाओढ असते. ही चढाओढ प्रत्येक पक्षामध्ये असते, असे म्हात्रे यांनी सांगितले.

आमच्यात समोरासमोर कधी भांडण झालेल नाही. आमच्यात भांडण लावण्याचे काम त्यांच्या आजूबाजूला जे गिरट्या घालतात ते करत असतात. ते त्यांनी समजून घ्यायला पाहिजे. ते माझ्यापेक्षा मोठे नेते आहेत. आम्ही नेहमीच त्यांचा नेते म्हणून आदर करतो, असे मत मंदा म्हात्रे यांनी व्यक्त केले.

# मतदान जनजागृतीत नवी मुंबईकर तृतीयपंथीयांचाही पुढाकार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई वमतदान हा संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेला समान हक्क असून आम्ही मतदान करणार आहोत, तुम्हीही मतदान करा असा संदेश नवी मुंबईतील तृतीयपंथी नागरिकांनी मार्केट, चौक व वर्दळीची ठिकाणे येथे प्रसारित केला. १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीत १०० टक्के मतदान व्हावे याकरिता स्वीप उपक्रमांतर्गत व्यापक जनजागृती करण्यात येत असून यामध्ये सर्व समाजघटकांचा उत्साही सहभाग लाभत आहे.

विशेषत्वाने शाळा-महाविद्यालयांमध्ये मतदान जागरुकता अभियान अत्यंत प्रभावीपणे राबविले जात आहे. त्याचप्रमाणे महिला मंडळे, विविध स्वयंसेवी संस्था, ज्येष्ठ नागरिक संघटना यांच्यामार्फतही यावर्षी पहिल्यांदाच होणा-या बहुसदस्यीय मतदान प्रक्रियेत कसे मतदान करावयाचे याविषयी माहिती प्रसारित केली जात आहे.

यामध्ये आता तृतीयपंथी नागरिकांनीही पुढाकार घेत वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक, अरेंजा कॉर्नर, से.९ मार्केट याठिकाणी मतदान जनजागृतीत प्रत्यक्ष सहभाग घेतला असून मतदानाविषयीची माहितीपत्रके वितरित करुन मतदान करण्याचे आवाहन केले आहे.

# गव्हाण विद्यालयात वाहतूक नियमांबाबत विद्यार्थ्यांचे समुपदेशन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्हावा शेवा पोलीस स्टेशन, नवी मुंबई वाहतूक शाखेच्या वतीने रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांना 'पोलीस रेझिंग डे सप्ताहा' निमित्त स्वसंरक्षणार्थ वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले.



न्हावा शेवा पोलीस स्टेशन, नवी मुंबई वाहतूक शाखेचे हावलदार भिमराव गोंधळी व पोलीस नाईक निलेश मोरे यांनी विद्यार्थ्यांना वाहतुकीच्या नियमांची माहिती देऊन स्वसंरक्षणार्थ वाहतूक नियमांचे पालन कसे करावे याचे धडे दिले. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी पालक, इतर कुटुंबीय व सर्व मित्रांनादेखील या संदर्भात जागरूकता निर्माण करण्यासाठी प्रोत्साहित करावे असे आवाहन करण्यात आले. विद्यालयाच्या व्हरांडा भिंतीवर वाहतूक नियमांची चिन्हे व त्यांच्या मार्गदर्शक सूचना प्रदर्शित केल्याबद्दल पोलीस दलातील कर्मचाऱ्यांनी समाधान व्यक्त करून कलाशिक्षक गणेश भोईर यांचेविषयी कौतुकोद्गार काढले.

प्रास्ताविक विद्यालयाचे उपशिक्षक रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर व नवी मुंबई आर. एस.पी.समादेशक देवेंद्र म्हात्रे यांनी केले. या वेळी हावलदार भिमराव गोंधळी व पोलीस नाईक निलेश मोरे यांचेसह न्हावा शेवा पोलीस स्टेशन वाहतूक शाखा, नवी मुंबईचे पोलीस शिपाई हिरूभाऊ आल्टे व संजय आगोणे यांचेसह विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, गुरूकुल प्रमुख संदीप भोईर, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे, सागर रंधवे, ग्रंथपाल महेश म्हात्रे, इतर शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# एमएसबीटीई हिवाळी परीक्षेत 'काळसेकर'च्या विद्यार्थ्यांचे यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी पनवेल येथील ए आर कालसेकर पॉलिटेक्निकच्या विद्यार्थ्यांनी एमएसबीटीई हिवाळी २०२५ डिप्लोमा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विविध अभ्यासक्रमांमध्ये महाविद्यालय स्तरावर (कॉलेज टॉपर) विद्यार्थ्यांनी सर्वोच्च गुण मिळवत संस्थेच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा अधोरेखित केली आहे.

महाविद्यालयीन टॉपर विद्यार्थ्यांमध्ये अन्सारी खतिजा अब्दुल समद हिने ऑटोमेंशन आणि रोबोटिकस या अभ्यासक्रमात ९७.८८% गुण मिळवत महाविद्यालयात प्रथम क्रमांक पटकावला. आर्टीफिशयल आणि मशीन लंरनिग या अभ्यासक्रमात महम्मद हुसेन यांनी ९५.४७% गुण मिळवत द्वितीय क्रमांक प्राप्त केला. याचप्रमाणे ऑटोमेशन अँड रोबोटिक्स या अभ्यासक्रमातून ठाकूर गुफरान यांनी ९४.८२% गुणांसह तृतीय क्रमांक, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लर्निंग या अभ्यासक्रमातून शेख आल्फिया हिने ९४.३५% गुण मिळवत चतुर्थ क्रमांक पटकावला. तसेच ऑटोमेशन अँड रोबोटिक्स मधून मौर्य ज्ञानेश आणि कॉम्प्युटर इंजिनिअरिंग मधून तिवारी आदित्य आशिष यांनी प्रत्येकी ९४% गुण मिळवत संयुक्तपणे पाचवा क्रमांक मिळवला.

या घवघवीत यशाबद्दल संस्थेच्या व्यवस्थापन मंडळ, प्राचार्य, विभागप्रमुख व प्राध्यापकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या यशामागे अंजुमन-इ-इस्लामचे अध्यक्ष डॉ. झहीर आय. काझी, बुरहान हारिस, डॉ. रमजान खाटीक आणि ए. आर. काळसेकर पॉलिटेक्निकचे प्राचार्य आरिफ शेख यांच्या सातत्यपूर्ण मार्गदर्शन, प्रेरणा आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टीकोनाचा मोलाचा वाटा आहे.

# संयम आणि आत्मविश्वास असल्यास यश आपल्याजवळ येते -शुभम आंबवणे

**कर्जत : प्रतिनिधी**

देशासाठी काही तरी केले पाहिजे. या भावनेने मी या क्षेत्रात पडलो. दहावीत पहिला किंवा पहिल्या पाचमध्ये उत्तीर्ण झाला तरच आपण यशस्वी होऊ शकतो असे नाही तर संयम आणि आत्मविश्वास असेल तर यश आपल्या जवळ येते, असे महत्वपूर्ण मार्गदर्शन केंद्र सरकार मध्ये उच्चपदस्थ अधिकारी असलेल्या शाळेचा माजी विद्यार्थी शुभम आंबवणे यांनी केले.

कर्जत एज्युकेशन सोसायटी संचलित इंग्लिश मीडियम स्कूलच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. स्नेहसंमेलनाच्या वार्षिक पारितोषिक वितरण समारंभा निमित्त माजी विद्यार्थी शुभम सुनील आंबवणे यांना प्रमुख पाहुणे निमंत्रित केले होते. त्यांच्या हस्ते दीप प्रज्वलित



करून कार्यक्रमाचे उदघाट्न करण्यात आले.

या वेळी कार्याध्यक्ष अनिरुद्ध जोशी, सचिव प्रवीण गांगल, खजिनदार मदन परमार, सतीश पिंपरे, श्रीकांत मनोरे, साक्षी आंबवणे, मुख्याध्यापिका अनुपमा चौधरी, सुनील बोरसे, नगमा नजे, भारती पाटील उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिव तांडव, दक्षिणात्य नृत्य, कोळी नृत्य, राजस्थानी लोकनृत्य, साऊथ इंडियन डान्स यांसारखी रंगतदार सादरीकरणे केली. तसेच महाभारतकालीन द्रौपदी वस्त्रहरणाचा देखावा आणि 'नटसम्राट' नाटकाचा एक अंक यामुळे प्रेक्षक भारावून गेले. त्यानंतर लहान विद्यार्थ्यांनी सादर केलेला रोप मल्लखांब हा विशेष आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला. वैष्णवी दगडे, देवराज बोराडे, संस्कार शेलार, आर्यन चव्हाण, अंश जोशी या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचे विशेष कौतुक करण्यात आले.

मुख्याध्यपिका चौधरी यांनी, शाळेचा शैक्षणिक आढावा सादर केला.डॉ. जोशी यांनी 'सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त शाळेत आध्यात्मिक, सांस्कृतिक, पारंपरिक उपक्रमांसह विज्ञान प्रदर्शन, नवरात्री उत्सव, विधी कार्यक्रम, आय कॅम्प, आजी-आजोबा कार्यक्रम, महिलांचा सत्कार, मतदान जनजागृती रॅली, रक्तदान शिबीर तसेच स्मरणिका प्रकाशन असे अनेक उपक्रम वर्षभर राबविण्यात आले, असे सांगितले.

# धावपळीच्या जीवनात मानसिक आजार वाढले

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांमध्ये मानसिक आजारांचे प्रमाण वाढत असतानाही उपचार घेणाऱ्या रुग्णांचे प्रमाण मात्र चिंताजनकरीत्या कमी असल्याचे वास्तव समोर आले आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षणानुसार मानसिक आरोग्य सेवांपर्यंत पोहचण्यात राज्यनिहाय मोठी तफावत दिसून येत आहे.

महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि राजस्थान या मोठ्या राज्यांमध्ये मानसिक आजारग्रस्तांची संख्या लक्षणीय असली तरी उपचार घेणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे. महाराष्ट्रात शहरी भागात काही प्रमाणात मानसोपचार सुविधा उपलब्ध असल्या तरी ग्रामीण आणि आदिवासी भागात उपचार यंत्रणा अपुरी ठरत आहे.

दक्षिण भारतातील केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जनजागृतीचे प्रमाण तुलनेने जास्त असून उपचार घेणाऱ्यांची टक्केवारी इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहे. मात्र उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये अजूनही मानसिक आजार म्हणजे सामाजिक कलंक अशी धारणा कायम आहे.

तज्ज्ञांच्या मते, राज्य पातळीवर मानसोपचारतज्ज्ञ, समुपदेशक आणि मानसिक आरोग्य केंद्रांची संख्या अपुरी आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये एकही पूर्णवेळ मानसोपचारतज्ज्ञ उपलब्ध नाही. परिणामी रुग्णांना खासगी उपचारांचा खर्च परवडत नाही आणि आजार वाढत जातो.

मानसिक आरोग्य सेवा प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंत नेणे, राज्य आरोग्य योजनांमध्ये मानसोपचाराचा समावेश करणे आणि शालेय पातळीवर समुपदेशन व्यवस्था बळकट करणे गरजेचे असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. अन्यथा येत्या काळात मानसिक आरोग्य हा राज्य सरकारांसाठी मोठा सामाजिक प्रश्न ठरण्याची शक्यता आहे.

स्माईल फाऊंडेशन या सामाजिक संस्थेने याबाबत जनजागृती कार्यक्रम करण्यावर भर दिला असून नवीन वर्षात मोफत मानसिक संतुलन शिबिर कार्यक्रम राबविणार असल्याचे सांगितले. एक स्माईल एक आयुष्य वाचवू शकते असे घोषवाक्य घेऊन जनजागृती कार्यक्रम होणार आहेत. असे संस्थेच्या सचिव स्नेहा शिंदे यांनी सांगितले.

# पेण तालुक्यातील पत्रकारांचा सहकुटुंब सन्मान

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील सर्व पत्रकार एकत्र येउन पत्रकार दिनाचे औचित्य साधून पेण तालुक्यातील पत्रकारांचा मान्यवरांच्या हस्ते सहकुटुंब सत्कार करण्यात आला.



या कार्यक्रमास प्रमुख अतिथी प्राध्यापक, गितकार विनायक पवार, नायब तहसिलदार प्रसाद कालेकर, पोलीस निरीक्षक संदीप बागुल, उद्योजक राजू पिचिका, अ‍ॅड. मंगेश नेने, मा. जि.प. सदस्य प्रभाकर म्हात्रे, नगरसेविका पल्लवी कालेकर, नगरसेविका आफ्रीन अखवारे उपस्थित होते.

सर्वप्रथम दर्पणकार वाळशास्त्री जांभेकरांच्या फोटोला हार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्या नंतर प्रमुख पाहुण्यांचे स्वागत गुलाबपुष्प देउन करण्यात आले तर प्रमुख अतिथी प्राध्यापक गितकार अभिनेते विनायक पवार यांचे शाल, भेटवस्तु देउन विशेष सत्कार करण्यात आले. उद्योजक राजू पिचिका यांनी सदैव पत्रकारांच्या बरोबर राहण्याचे अभिवचन दिले. पोलीस निरिक्षक संदीप बागूल यांनी पत्रकार आणि पोलीस खाते हे एकाच नाण्याच्या दोन वाजू आहेत.


महानगरातील पत्रकारीता आणि पेण मधील पत्रकारीता यांच्यात जमीन आसमानाचा फरक आहे. ब्रेकींग न्यूजच्या जमान्यातदेखील आज पेण येथील पत्रकार एखाया बातमीची पुर्ण खात्री जमा केल्याशिवाय बातमी लावत नाहीत. आज पत्रकार हे समाजाचा आरसा आहे. ते आमच्या चुका असल्या तरी दाखवतात आणि आम्ही एखादे काम उत्तम केल्यास तेवढ्याच तत्परतेने आमची वाहवाह करतात. पत्रकारांनी समाजात कसा समतोल राखायचा याचा उत्तम काम पेणचे पत्रकार करत आहे. भविष्यात पोलीस आणि पत्रकार हातात हात घालून काम करू, असे शेवटी त्यांनी सांगितले.

नायब तहसिलदार प्रसाद कालेकर यांनी पत्रकार आणि प्रशासन एकत्र आल्यास मोठा बदल होउ शकतो आणि हे बदल करण्याची ताकद पत्रकार आणि प्रशासनात आहे असे सांगितले. तर प्रमुख अतिथी प्राध्यापक गितकार अभिनेते विनायक पवार यानी अध्यक्षीय भाषणामध्ये अनेक किस्से सांगून पत्रकार व पत्रकारांच्या कुटुंबियांचे मनोरंजन केले. त्यांनी पत्रकार समाजाच्या डोळ्यात अंजन कसे घालू शकतात याबाबतही भाष्य केले आणि आपले सिनेमातील गाजलेले गाणी त्यांनी गाउन दाखवले तद नंतर सर्व पत्रकारांच्या अर्धागिनींना मान्यवरांच्या हस्ते भेट वस्तू देण्यात आले आणि सर्वांनी स्नेहभोजनाचा लाभ घेतला.

## दुखवटा

### विठोबा खाडे

**नागोठणे :** नागोठणेजवळील वणी गावातील रहिवासी रायगड जिल्हा परिषद सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक हभप विठोबा धोंडू खाडे गुरूजी यांचे शुक्रवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात उच्च शिक्षित तीन मुले, सुना, एक मुलगी व जावई, नात, नातू असा मोठा परिवार आहे. कै. खाडे



गुरुजी यांचा दशक्रिया विधी शनिवारी (दि.१७) वणी येथे व उत्तरकार्य मंगळवारी (दि.२०) वाकण जवळील मोरया होम टाऊनमधील त्यांच्या राहत्या घरी होणार असल्याची माहिती त्यांचे जावई पांडुरंग शिंदे यांनी दिली.

# महायुतीच्या उमेदवारांना मतदारांचा अभूतपूर्व प्रतिसाद

## प्रभाग १४मध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत रॅली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



खांदा वसाहतीमधील प्रभाग क्रमांक १४मध्ये महायुतीच्या उमेदवारांना मतदारांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी (दि.९) प्रभाग १४ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या रॅलीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महायुतीचा विजय निश्चित असल्याचे ठामपणे सांगितले.

या परिसरात ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांचा पाठिंबा महायुतीच्या उमेदवारांना मिळत आहे. ताफ्यामुळे सर्व उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. खांदा वसाहत येथे झालेल्या या जोरदार प्रचारादरम्यान प्रभाग १४ चे उमेदवार इकबाल हुसेन काझी, सारिका अतुल भगत, सतीश दत्तात्रेय पाटील आणि रेणुका मयुरेश नेतकर यांच्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मतदारांशी संवाद साधला.

प्रचारादरम्यान ठिकठिकाणी महिलांनी उमेदवारांचे औक्षण करून स्वागत केले आणि विजयाचा आशीर्वाद दिला. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रतक्प्रभा घरत, वर्षा ठाकूर, माजी नगरसेवक मुकीत काझी, गणपत म्हात्रे, माजी नगरसेविका हेमतला म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, आरपीआयचे शहराध्यक्ष निलेश सोनावणे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण पनवेल महानगरपालिका क्षेत्रात महायुतीचा प्रचार आता वेगवान झाला असून, खांदा वसाहतीमध्ये जोरदार शक्तीप्रदर्शन करत प्रचार करण्यात आला.

## महायुतीचा मोठा विजय होणार -शिवदास कांबळे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि आरपीआय महायुतीला मतदारांकडून प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे पनवेल महानगरपालिका क्षेत्राचे जिल्हाध्यक्ष शिवदास कांबळे यांनी याबाबत प्रतिक्रिया देताना सांगितले की, लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी गेल्या अनेक वर्षांत पनवेल तालुका आणि रायगड जिल्ह्यात केलेल्या भरीव विकासकामांची ही पोचपावती आहे.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या कामांना भरघोस पाठिंबा देण्यासाठी आम्ही सर्व पक्ष एकत्र येत महायुती केली आहे. या महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचाराला मिळणारा प्रतिसाद पाहता पनवेल महानगरपालिकेत महायुतीला विक्रमी आणि मोठा विजय मिळणार, याबद्दल



कोणतीही शंका नाही, असा विश्वास कांबळे यांनी मुलाखतीत व्यक्त केला.

ते पुढे म्हणाले की, ज्या पक्षात कार्यकर्त्यांना न्याय दिला जातो आणि ज्यांच्याकडे ठोस नेतृत्व असते, त्या पक्षांचे कार्यकर्ते कधीही निवडणुकीतून माघार घेत नाहीत, मात्र शेतकरी कामगार पक्ष पुरस्कृत महाविकास आघाडीची परिस्थिती आज इतकी दयनीय झाली आहे की, त्यांच्या पक्षाकडे सक्षम उमेदवारच उरलेले नाहीत. महाविकास आघाडीकडे ना राजकीय इच्छाशक्ती आहे, ना जनतेसमोर मांडण्यासारखी विकासाची कामगिरी. त्यामुळेच त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये निराशा पसरली असून अनेक ठिकाणी उमेदवारच मिळत नाहीत, अशी टीका त्यांनी केली. गेल्या पाच वर्षांत महायुतीने पनवेल महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर विकासकामे केली आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, आरोग्य सुविधा, शिक्षण आणि इतर नागरी सुविधांच्या माध्यमातून नागरिकांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यात आला आहे.

दुसरीकडे महाविकास आघाडीच्या काळात कोणतीही ठोस विकासकामे झालेली नसल्याने आज त्यांच्याकडे जनतेला दाखवण्यासारखे काहीच नाही, असेही कांबळे यांनी ठणकावून सांगितले. महायुतीचे अनेक उमेदवार बिनविरोध निवडून येत आहेत, हेच महाविकास आघाडीच्या अपयशाचे स्पष्ट उदाहरण असल्याचे त्यांनी नमूद केले. जनतेचा विश्वास महायुतीवर आहे, म्हणूनच विरोधक मैदान सोडत आहेत, असेही ते म्हणाले.

खारघरमध्ये घडलेल्या घटनेचा उल्लेख करताना शिवदास कांबळे यांनी तीव्र शब्दांत निषेध व्यक्त केला. महाविकास आघाडीचे लोक इतके फ्रस्ट्रेट झाले आहेत की त्यांना सत्ताधाऱ्यांवर राजकीय लढाई लढता येत नाही, म्हणून ते थेट शासकीय यंत्रणेवर हल्ले करत आहेत. निवडणूक आयोगाच्या कॅमेरामनला मारहाण होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. या प्रकरणात योग्य ती कठोर कारवाई झाली नाही, तर आम्ही याविरोधात जोरदार आवाज उठवू, असा इशाराही त्यांनी दिला. एकंदरीत पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीत महायुतीचे पारडे जड असून विकासाच्या जोरावर आणि जनतेच्या विश्वासाच्या बळावर महायुती मोठ्या फरकाने विजय मिळवेल, असा ठाम विश्वास शिवदास कांबळे यांनी व्यक्त केला आहे.

## जनतेची दिशाभूल करणाऱ्या प्रवृत्तींना दूर ठेवा -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सबका साथ, सबका विकास हे व्हिजन घेऊन भारतीय जनता पक्ष महायुती खारघरसह संपूर्ण पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विकासाची गंगा पोहचवत आहे. महापालिकेच्या माध्यमातून आरोग्य आणि पायाभूत सुविधांची अनेक कामे मार्गी लागली आहेत, मात्र ज्यांना केवळ पदे हवी आहेत आणि ज्यांना पदाशिवाय काहीच दिसत नाही, अशा संधीसाधूंनी भाजपची सोडून वेगळी वाट धरली आहे. जनतेची दिशाभूल करणाऱ्या अशा प्रवृत्तींना वेळीच ओळखून त्यांना दूर करा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर येथील प्रभाग



क्रमांक ६मध्ये आयोजित प्रचारादरम्यान केला.

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ६ मधील महायुतीचे उमेदवार उषा अजित अडसुळे, नरेश गणपत ठाकूर, सोनल अजिंक्य नवघरे आणि समीर श्रीकांत कदम यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी भव्य रॅली काढण्यात आली होती. यावेळी खासदार धैर्यशील पाटील आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी या परिसरात जोरदार शक्तीप्रदर्शन केले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भाजपचा कार्यकर्ता महायुतीच्या विजयासाठी अहोरात्र मेहनत घेत आहे. खारघरचा विकास हा केवळ महायुतीच्या खंबीर पाठबळामुळेच शक्य झाला असून, आगामी काळातही नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही पूर्ण ताकदीने तत्पर राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रचारात सहभागी झालेले खासदार तथा भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनीही महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. प्रभाग ६ मधील मतदारांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, या ठिकाणी पुन्हा एकदा कमळ फुलण्यासाठी प्रत्येक नागरिक सज्ज झाला असल्याचे चित्र दिसत आहे. या प्रचार दौऱ्यावेळी आमदार विक्रांत पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राष्ट्रवादीचे शिवदास कांबळे यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रभाग १२मध्ये भाजप महायुतीच्या उमेदवारांचा जोरदार प्रचार दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर कामोठे प्रभाग क्रमांक १२ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवारांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. प्रभाकर शाबा कांबळे (अ), विद्या प्रकाश तामखडे (ब), कुसुम रविंद्र म्हात्रे (क) आणि दिलीप बाळाराम पाटील (ड) हे उमेदवार मतदारांशी थेट संवाद साधत घरोघरी जाऊन प्रचार करत आहेत.

प्रभागात आतापर्यंत झालेल्या विविध विकासकामांची माहिती देत कार्यकर्ते आणि उमेदवार मतदारांशी संवाद साधत असून,



नागरिकांकडून या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रचारादरम्यान घोषणाबाजी, नागरिकांचा सहभाग आणि कार्यकर्त्यांचा उत्साह पाहायला मिळत असून संपूर्ण प्रभाग क्रमांक १२ भाजपमहायुतीमय वातावरणात दुमदुमून गेला आहे.विशेष म्हणजे, प्रभाग १२ मधील उमेदवारांपैकी दिलीप पाटील हे शिक्षण महर्षी असून या तर प्रभाकर कांबळे विद्या तामखडे आणि कुसुमताई हे समाजसेवक आहेत. त्यामुळे भाजपने या निवडणुकीत नागरिकांच्या समस्या सोडवणारे आणि अनुभव असलेले उमेदवार मतदारांसमोर दिले असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे.

याच कारणामुळे सुज्ञ मतदारांकडून या उमेदवारांचे स्वागत होत असून, विकासाभिमुख नेतृत्वाला पाठिंबा देण्याची भावना प्रभागात दिसून येत आहे.



**पनवेल : दै. युवक आधारचे संपादक संतोष आमले यांनी २०२६ सालची दिनदर्शिका प्रसिद्ध केली आहे. या दिनदर्शिकेचे प्रकाशन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी झाले. प्रकाशनावेळी ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, रायगड ग्राम सिटीचे संपादक अण्णासाहेब आहेर, रायगड टाइम्सचे प्रतिनिधी राम बोरले, दै. युवक आधार संपादक संतोष आमले, सहसंपादक मुकुंद कांबळे, मुंबई विभाग संपादक किशोर गुडेकर, पनवेल तालुका प्रतिनिधी मच्छिंद्र पाटील, स्थानिक प्रतिनिधी जगदीश क्षीरसागर आदी उपस्थित होते.**

## महाविद्यालयांमध्ये माझे पहिले मत-माझा आवाज उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने नागरिकांमध्ये, विशेषतः प्रथमच मतदान करणाऱ्या युवक-युवतींमध्ये मतदानाबाबत जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली नुकतेच विविध महाविद्यालयांमध्ये परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रथमतः मतदान करणाऱ्या युवक-युवतींमध्ये 'माझे



पहिले मत - माझा आवाज' या संकल्पनेवर आधारित मतदार जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमांतर्गत आगरी शिक्षण संस्था, के.एस.ए. बान्स महाविद्यालय, डी.एस.पी. महाविद्यालय (सीबीएसई), सुषमा पाटील विद्यालय, मानसरोवर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, डी. एस.पी. महाविद्यालय (स्टेट बोर्ड), एम.जी.एम. वैद्यकीय महाविद्यालय तसेच रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर येथे मतदान जनजागृती विषयक प्रबोधनपर परिसंवाद घेण्यात आले.

या परिसंवादांमध्ये मतदानाचा अधिकार, लोकशाही व्यवस्थेतील मतदानाचे महत्त्व, सजग व जबाबदार मतदाराची भूमिका तसेच निर्भय व प्रामाणिक मतदान करण्याचे कर्तव्य याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. प्रथमच मतदान करणाऱ्या युवक-युवतींनी या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

पिल्लई महाविद्यालय येथे मतदान जनजागृतीसाठी नुकतेच परिसंवाद व वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले. या वॉकेथॉनच्या माध्यमातून लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येकाने मतदानचा हक्क बजावावा हा संदेश जनतेपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यात आला. या उपक्रमांमुळे नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक जनजागृती होत असून येणाऱ्या निवडणुकीत अधिकाधिक मतदारांनी मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवून, मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक क्षेत्रभेट




**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य संघटनेतर्फे शुक्रवारी (दि.९) विद्यार्थ्यांसाठी मुंबई येथील बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज तसेच भारतीय रिझर्व्ह बँक संग्रहालयास शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

या भेटीमुळे विद्यार्थ्यांना भारतीय वित्तीय प्रणाली, चलनाचा इतिहास व उत्क्रांती, बॉम्बे स्टॉक एक्स्चेंज व राष्ट्रीय शेअर बाजाराची कार्यपद्धती, स्थूल व सूक्ष्म अर्थशास्त्र तसेच शेअर व्यवहार याबाबत प्रत्यक्ष व व्यावहारिक ज्ञान मिळाले. या शैक्षणिक भेटीदरम्यान कुरेशी शेख, राजेंद्र बेंद्रे तसेच कु. सबिना शेख यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शक केले तसेच या उपक्रमासाठी प्रा. राहुल कांबळे व प्रा. योगिता पाटील यांनी विद्यार्थ्यांनाच्या सोबत राहुन सहकार्य केले.

वाणिज्य संघटनेतर्फे या यशस्वी उपक्रमासाठी वाणिज्य संघटनेचे समन्वयक डॉ. प्रवर शर्मा, विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. महेश्वरी झिरपे तसेच आयक्यूएसी समन्वयक प्रा. प्रथमेश उदेकर या सर्वांचे त्यांच्या सहकार्याबद्दल व मार्गदर्शनाबद्दल मनःपूर्वक आभार मानले. यासोबतच वाणिज्य संघटनेच्या सर्व सदस्यांचे सहकार्य व मार्गदर्शनाबद्दल विशेष कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

## 'सीकेटी'च्या अनुज निवातेची क्रिकेटमध्ये दमदार कामगिरी



**पनवेल :** शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही अव्वल स्थान राखणाऱ्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी इंग्रजी माध्यमिक विद्यालयाचा शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. विद्यालयातील सातवीमध्ये शिकणारा क्रिकेटपटू अनुज संतोष निवाते याने २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात क्रिकेटच्या मैदानावर देदीप्यमान कामगिरी करत थेट आंतरराष्ट्रीय स्तरावर झेप घेतली आहे. अनुजने गेल्या वर्षभरात विविध प्रतिष्ठित स्पर्धांमध्ये आपल्या अष्टपैलू कौशल्याच्या जोरावर अनेक पुरस्कारांवर नाव कोरले असून त्याच्या या यशाने पनवेलच्या क्रीडा क्षेत्रात कौतुकाचा वर्षाव होत आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अनुजचे अभिनंदन करून त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## गव्हाण विद्यालयात 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा'च्या फेरीचे पर्यवेक्षण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये गुरुवार ८ जानेवारी २०२६ रोजी 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' टप्पा क्र.३ चे केंद्रातील पहिल्या फेरीचे पर्यवेक्षण झाले.

या वेळी नेरे केंद्राच्या केंद्रप्रमुख रंजना केणी, ओवळे शाखेचे मुख्याध्यापक द.वि. पाटील, विहिघर शाळेचे शिक्षक भरत शेडगे, आंबिवली शाळेचे गोरखनाथ चव्हाण, चिंचवन शाळेचे दर्शन जोशी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. या पर्यवेक्षण पथकातील सदस्यांचे विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन दर्शना माळी यांनी केले. मुख्यमंत्री माझी शाळा -सुंदर शाळा टप्पा क्र. ३चे केंद्रातील पहिल्या फेरीचे पर्यवेक्षणात अपेक्षित निकषनिहाय पडताळणी पथकातील सर्व सदस्यांनी केली व उपलब्ध भौतिक सुविधांचीही पाहणी केली.

या वेळी विलासराव लेंभे, शशिकला पाटील, 'रयत'चे लाईफ मेंबर रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे, क्रीडा शिक्षक सुरेश पारखे आदी शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.



# आर.के. फिल्मचे पुनरुज्जीवन

## गोष्ट व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाची

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक














तुम्हालाही माहित्येय आज आपण सोशल मिडियाच्या युगात जगतोय... एका क्लिकवर जगभरातील अनेक भाषेतील माहिती उपलब्ध होतेय आणि मनोरंजन होतेय...

एक साधं उदाहरण घ्या, पन्नास वर्षांपूर्वी घरात दूरध्वनी असणं हे श्रीमंतीचे लक्षण मानले जाई. आज हातोहाती मोबाईल फोन आहे. आज खरोखरच दुनिया मेरी मुठ्ठी मे आहे. मोबाईल म्हणजे चालते फिरते विश्वच...

हे का सांगतोय, तर पृथ्वीराज कपूर यांचा पणतू रणबीर कपूर याने आपण आपल्या कुटुंबियांचे चित्रपट निर्मितीचे बॅनर आर.के. फिल्म याचे पुनरुज्जीवन करीत असल्याचं सोशल मीडियात म्हटले आणि जुन्या पिढीतील चित्रपट रसिकांना काही प्रश्न पडले. रणबीर कपूर पुन्हा आर.के. स्टुडिओची स्थापना करणार आहे का? तर अजिबात नाही. कारण चित्रपटसृष्टीच्या इतिहासात अतिशय मानाचे स्थान प्राप्त केलेल्या चेंबूरच्या आर.के. स्टुडिओच्या जागेवर एक उंच प्रशस्त इमारत उभी राहिली आहे आणि बाहेर फक्त आणि फक्त आर.के. फिल्मचा सुपरिचित लोगो आहे.

आर.के. स्टुडिओचे पुनरुज्जीवन म्हणजे आर.के. फिल्म या बॅनरखाली चित्रपट निर्मिती करणार. आज चित्रपट निर्मितीत मोठ मोठ्या कार्पोरेट कंपन्या कार्यरत आहेत, भल्या मोठ्या बजेटचे चित्रपट ते निर्माण करत आहेत. आज आपण पॅन इंडिया चित्रपटाच्या युगात आहोत. एका भाषेतील चित्रपट अन्य प्रादेशिक भाषेत आणि हिंदीतही डब करून जगभरातील अनेक देशांमध्ये प्रदर्शित करणे हा आजचा ट्रेण्ड आहे आणि या चित्रपटांना सबटायटल्स आहेत. रणबीर कपूर आता आर.के. फिल्मसाठी चित्रपट निर्मिती करेल तो असा असेल, तो कदाचित आर.के. फिल्मच्या परंपरेतील नसेल आणि ते आपल्याला स्वीकारावे लागेल. प्रश्न असा आहे की, रणबीर कपूरला यासाठी खरंच वेळ आहे का? दोन अतिशय मोठ्या महत्त्वाकांक्षी चित्रपटात तो सध्या विलक्षण बिझी आहे. ते चित्रपट आहेत नितेश तिवारी दिग्दर्शित रामायण आणि संजय लीला भन्साळी दिग्दर्शित लव्ह ॲण्ड वॉर. मल्टीप्लेक्समधील भव्य दिव्य दिमाखदार पडद्यावरच्या मनोरंजनाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतोय याच कल्चरमधील हे चित्रपट आहेत. यातून वेळ मिळालाच तर रणबीर कपूरला आपल्या आर.के. फिल्मसाठी कथासूत्र, दिग्दर्शक निवडण्यापासून लक्ष देता येईल...

तुम्हालाही नक्कीच कल्पना असेल तब्बल सत्तावीस वर्ष झालीत, आर.के. फिल्म बॅनरखालील चित्रपट पडद्यावर आलेला नाही. म्हटलंत तर धक्कादायक. म्हटले तर त्यात नवल नाही, कारण चित्रपट आणि चित्रपटसृष्टी बरीच बदललीय.

भारतीय चित्रपटसृष्टीतील 'आर.के. फिल्मच्या चित्रपटांचे सातत्य, ग्लॅमर, महत्त्व, अस्तित्व, यशापयश, इतकेच नव्हे तर अगदी गॉसिप्स यांचा खूपच मोठा गौरवशाली इतिहास असल्याचे चित्रपट रसिकांना चांगलेच ज्ञात आहे'.

राज कपूरने अभिनेता, त्या अनुभवातून निर्माता व दिग्दर्शक आर. के. फिल्म बॅनरची स्थापना, 'आग' (या चित्रपटाच्या दिग्दर्शनाच्या वेळेस राज कपूरचे वय चोवीस होते हे विशेष. साल १९४८) निर्मितीवस्थेत असतानाच चेंबूर येथे अतिशय देखणा व भव्य असा आर.के. स्टुडिओ उभारला. चित्रपट निर्मिती, दिग्दर्शन व संकलन यांचे सातत्य. मनोरंजनातून प्रबोधन हे वैशिष्ट्य. स्वतःचा हुकमी प्रेक्षकवर्ग निर्माण होत गेला. राज कपूर दिग्दर्शित 'बरसात' (१९४९), 'आवारा' (१९५१. हा चित्रपट त्या काळात बीबीसीवर दाखवला गेला), 'श्री ४२०' (१९५५), संगम (१९६४), 'मेरा नाम जोकर' (१९७०) (याच टप्प्यावर राज कपूरमधील 'कलाकार ' मागे पडत जाऊन 'शोमन' एस्टॅब्लिज होत गेला. नायिकेचे मन जाणून घेणारा आता तिचं शरीरसौंदर्यही दाखवू लागला हे चित्रपट जास्त दिसू लागले. राज कपूर बदलला. तो कलरफुल झाला.) 'बॉबी' (१९७३), 'सत्यम शिवम सुंदरम' (१९७८), प्रेम रोग (१९८२), 'राम तेरी गंगा मैली' (१९८५) यांचे दिग्दर्शन त्यांनी केले. त्याचबरोबर 'आह' (राजा नवाथे दिग्दर्शित १९५३), 'बूट पॉलिश' (दिग्दर्शक प्रकाश अरोरा १९५३), शंभू मित्रा व अमित मोईत्रा दिग्दर्शित 'जागते रहो' (१९५६), राधु कर्मकार दिग्दर्शित 'जिस देश मे गंगा बहती है' (१९६०), रणधीर कपूर दिग्दर्शित 'कल आज और कल' (१९७१), धरम करम (१९७६) आणि हीना (१९९१), राहुल रवैल दिग्दर्शित 'बीवी ओ बीवी' (१९८२), राजीव कपूर दिग्दर्शित 'प्रेम ग्रंथ' (१९९६) या चित्रपटांची निर्मिती आर.के. फिल्मने केली. यातील जवळपास प्रत्येक चित्रपटासाठी आर.के. स्टुडिओत भव्य दिव्य दिमाखदार सेट लागले. ते पडदाभर दिसले. ('आवारा'मधील स्वप्न दृश्याचा सेट गाजला),

दृश्य सौंदर्याचा त्यात प्रत्यय आला. आवारा चित्रपटाची रशिया व पूर्व युरोपमधील लोकप्रियता कायमच कौतुकाची गोष्ट ठरली. चीनचे क्रांती नेते माओ त्से तुंग यांना हा चित्रपट आवडे असे टाईम मासिकाने म्हटले. 'श्री ४२०'मध्ये राज कपूरमध्ये चार्ली चॅप्लीनच्या छटा दिसल्या. ही यशस्वी चौफेर वाटचाल आ अब लौट चले या चित्रपटापर्यंत आली. चित्रपटाचे नाव 'जिस देश में गंगा बहती है'मधील लोकप्रिय गाण्याचा मुखडा. ऋषि कपूरने या चित्रपटातून दिग्दर्शनात पाऊल टाकले. तोपर्यंत अभिनेता म्हणून मोठीच वाटचाल होतीच. त्यात तो 'कपूर'. चित्रपट माध्यम व व्यवसायात सकारात्मक पाऊल टाकणारा (पण आपल्याच दिग्दर्शनातील चित्रपटातून भूमिका करणे मात्र टाळले). सुभाष घई दिग्दर्शित 'ताल'ची अक्षय खन्ना व ऐश्वर्या राय अशी रोमॅन्टीक जोडी पुन्हा आ अब लौट चले या चित्रपटात जमली. राजेश खन्ना व मौशमी चटर्जी चरित्र भूमिकेत (अक्षय खन्नाचे पडद्यावर माता व पिता.) आहेत.

राजेश खन्ना आर.के. फिल्मच्या चित्रपटात ही जणू ब्रेकिंग न्यूजच. राज कपूर दिग्दर्शित 'सत्यम शिवम सुंदरम' (१९७८)साठी राजेश खन्नाचीच नायक म्हणून निवड झाली होती. राजेश खन्नाचा तो 'पडता काळ' असल्यानेच त्याला मोठ्या बॅनरचा हुकमी चित्रपट मिळावा म्हणून डिंपलनेच राज कपूरला विनंती केली हे गॉसिप्स फार गाजले आणि शम्मी कपूरच्या दबाबातून राजेश खन्नाला चित्रपटातून काढले. ही गोष्ट सहन न झाल्याने राजेश खन्नाने रागाच्या आपल्या आशीर्वाद बंगल्यातील काचेची वस्तू फोडल्याचे गॉसिप्स बराच काळ रंगले. असं सगळं असल्यानेच आता 'आ अब लौट चले'मध्ये राजेश खन्ना भूमिका साकारत होते हे विशेष. चित्रपट स्वीकारल्यावर राजेश खन्ना आर.के. कॉटेजमध्ये जाऊन रणधीर, ऋषि व राजीव या कपूरबंधुना भेटल्याचा फोटो चक्क एक्स्युझिव्हज ठरला.

चित्रपटाची स्टाईलीश आणि लक्षवेधक पूर्वप्रसिद्धी ही आर.के. फिल्मची खासियत याही चित्रपटाच्या वेळेस कायम राहिली. मला आठवतंय, आम्हा चित्रपट समीक्षकांसाठी आर. के. स्टुडिओतील मिनी थिएटरमध्ये या चित्रपटाचा प्रेस शो न करता मेन थिएटर मिनर्व्हात फर्स्ट डे फर्स्ट शोची पब्लिकसोबत चित्रपट पाहण्यासाठी तिकीटे दिली. (दिवस होता, २२ जानेवारी १९९९) विशेष गोष्ट, चित्रपटाच्या मध्यंतरला शशी कपूर आम्हा चित्रपट समीक्षकांना भेटायला आला होता (आता तो शर्मिली, आ गले लग जा, त्रिशूल, चोर मचाये शोर या काळातील सडसडीत शशी कपूर राह्यला नव्हता हे सांगायलाच नको.) त्याला आमची मते जाणून घ्यायची होती. चित्रपट लॅव्हीश होता. खूप दिवसांनी राजेश खन्नाने अतिशय उत्तम अदाकारी साकारली होती. गीत संगीत (समीर व नदीम श्रवण) आर. के.च्या परंपरेला अजिबात साजेसे नव्हते. (ते अपेक्षितही नव्हते. राज कपूरचा गीत संगीताचा उच्च क्लास गाणी ऐकण्यात व पडदाभर पाहण्यात असे. कम्माल असे. त्या काळातील गाणी आजही लोकप्रिय. कधीही ऐकावीत आणि पहावीत. तोच मनसोक्त आनंद ).


'आ अब लौट चले'ने साधारण स्वरूपाचे यश प्राप्त केले. आता प्रश्न होता आर. के. फिल्मचा पुढचा चित्रपट कोणता? दिग्दर्शक कोण असेल? कलाकार कोण असतील? बरेच दिवस झाले, महिने झाले, वर्षही सरली. आता तर चक्क सत्तावीस वर्ष पूर्ण झालीत, पण ही अतिशय प्रतिष्ठित चित्रपट निर्मिती संस्था कळत नकळतपणे इतिहासजमा झाली असेच म्हणायचे का?

मधल्या काळात दोन गोष्टी घडल्या. सप्टेंबर २०१७मध्ये आर. के. स्टुडिओतील एका बाजूस आग लागली आणि चित्रपट शौकीन हळहळले. २०१९ साली मात्र मोठाच धक्का बसला. ऋषि कपूरने म्हटलं, हृदयावर हात ठेवून आम्ही हा आर. के. स्टुडिओ बंद करून तो विक्रीचा निर्णय घेतला असल्याचे जाहीर केले आणि क्षणात आर.के.च्या चित्रपटांचा फ्लॅशबॅक डोळ्यासमोर आला. एक फार मोठी गौरवशाली ऐतिहासिक वास्तूच आता पाडली जाणार होती. नाईलाज व दुर्दैव. आज त्याच जागेवर एक चकाचक भव्य इमारत उभी असल्याचे दिसतेय. त्याचा पाया आर.के. फिल्म आणि अन्य चित्रपट निर्मात्यांच्या चित्रपटांचे मुहूर्त, शूटिंग, प्रिव्ह्यू शो यांचा आहे. तेथे चित्रपट जगलाय, वाढलाय, रूजलाय. त्यावरची इमारत आधुनिक असेलही पण मूळ वास्तू कलेची सेवा व निर्मिती करणारी होती.

काहीही असलं तरी इतरत्र कार्यालय स्थापून आर.के. फिल्मच्या चित्रपटांची निर्मिती कायम ठेवता आली असती. करिश्मा कपूर, करिना कपूर, जावई सैफ अली खान पतौडी, रणबीर कपूर, सून आलिया भट्ट हे सेलिब्रिटीज ती यशस्वी कलरफुल परंपरा निश्चित कायम ठेवण्यात यशस्वी ठरले असते. तशी त्यांची आर्थिक क्षमता आणि लोकप्रियता नक्कीच आहे. इतिहासजमा होण्यापेक्षा इतिहास घडवत राह्यला हवे, पण तशी इच्छा हवी...

अशातच काही महिन्यांपूर्वी एक सुखद धक्का बसला आणि त्यानुसार रणबीर कपूर आर.के. फिल्म या बॅनरखाली चित्रपट निर्मिती नक्कीच करेल, पण तो चित्रपट (अथवा सातत्य ठेवण्याची सकारात्मक वृत्ती असेल तर ते चित्रपट) आर.के. बॅनरच्या परंपरेतील नक्कीच नसतील. यात काळाचा फरक आहे हे लक्षात घेऊन हे विधान करतोय. आज कथासूत्र एवढेसे आणि त्यावर व्हीएफएक्स आणि एआय तंत्रज्ञानाचा वापर भरपूर अशा काळात आपण पोहचलोय, त्याचं प्रतिबिंब आर. के. फिल्मच्या आजच्या ग्लोबल युगातील डिजिटल पिढीसाठीच्या चित्रपटात असेल/दिसेल. हे नवीन आर.के. फिल्म आहे.

# ज्ञानपीठ विजेते साहित्यिक वि.स. खांडेकर



प्रसिद्ध मराठी कथा-कादंबरीकार, लघुनिबंधकार आणि समीक्षक विष्णू सखाराम खांडेकर यांची आज जयंती. त्यांचा जन्म सांगलीत ११ जानेवारी १८९८ रोजी झाला. शिक्षण सुरुवातीला सांगली व नंतर पुणे येथे इंटर आर्ट्सपर्यंत झाले. वयाच्या अठराव्या वर्षी चुलत चुलत्यांनी त्यांना दत्तक घेतले. ते १९२०मध्ये शिरोड्याच्या ट्यूटोरिअल इंग्लिश स्कूलमध्ये प्रथम शिक्षक व नंतर मुख्याध्यापक. १९३८मध्ये या शाळेतून निवृत्त झाल्यानंतर ते कोल्हापूर येथे वास्तव्यास आले.

खांडेकरांचे लेखन १९१९पासून प्रकाशित होऊ लागले. त्यांनी 'कुमार' या टोपण नावाने कविता व 'आदर्श' या टोपण नावाने विनोदी लेख प्रसिद्ध केले. वयाच्या सोळाव्या वर्षी लिहिलेले रमणीरत्न हे त्यांचे नाटक अप्रकाशित आहे. 'घर कुणाचे' ही त्यांची पहिली लघुकथा १९२३मध्ये महाराष्ट्र साहित्य या मासिकात प्रसिद्ध झाली. नवमल्लिका (१९२९) हा त्यांचा पहिला कथासंग्रह. हृदयाची हाक (१९३०) ही त्यांची पहिली कादंबरी. वायुलहरी (१९३६) हा त्यांचा पहिला लघुनिबंधसंग्रह.

खांडेकरांचे लेखन बहुविध स्वरूपाचे असून त्यात १५ कादंबऱ्या, ३१ लघुकथासंग्रह, १० लघुनिबंधसंग्रह, सहा रूपककथासंग्रह, एक नाटक याशिवाय काही चरित्रात्मक/समीक्षात्मक ग्रंथ व संकीर्ण लेखसंग्रहांचा समावेश होतो तसेच त्यांनी मराठी, हिंदी व तेलुगू चित्रपटांसाठी एकूण १८ पटकथा लिहिलेल्या आहेत. धर्मपत्नी हा तेलुगू चित्रपट व बडी माँ, दानापानी ह्यांसारखे हिंदी चित्रपट त्यांच्याच पटकथांवर आधारलेले होते.

खांडेकर यांच्या बहुतेक साहित्यकृतींच्या अनेक आवृत्त्या निघाल्या आहेत. अनेक कादंबऱ्यांचे भारतातील अन्य भाषांत विशेषतः गुजराती, तमिळ, हिंदी अनुवाद झालेले आहेत. त्यांच्या काही कथांची भाषांतरे इंग्रजी, रशियन व चेक या भाषांतून झालेली आहेत. अनेक पुस्तकांचे त्यांनी संपादन केले आहे. अनेकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत.

जीवन व कला यांना वाहिलेल्या ज्योत्स्ना या मासिकाचे खांडेकर संपादक होते. १९६१मध्ये त्यांच्या ययाति या कादंबरीस महाराष्ट्र सरकारने कादंबरी विभागाचे पहिले पारितोषिक दिले. या कादंबरीस त्याच वर्षी साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळाले. या कादंबरीत आधुनिक जीवनाला ग्रासून टाकणाऱ्या भोगवादावरील भेदक भाष्य आढळते. १९४१मध्ये सोलापूर येथे झालेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या रौप्य महोत्सवी अधिवेशनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. १९५७ साली मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद त्यांना मिळाले. १९६८मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मभूषण हा किताब दिला. १९७०मध्ये त्यांना साहित्य अकादेमीचे फेलो नेमण्यात आले.

पूर्ववयात खांडेकरांवर आगरकर, केशवसुत, हरिभाऊ, श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, राम गणेश गडकरी इत्यादींच्या साहित्याचे उत्कट संस्कार झाले आणि त्यामुळे मूलतःच समाजप्रवण असलेले त्यांचे मन अधिक समाजसन्मुख झाले. अश्रद्ध झालेल्या मानवी मनाला जीवनविषयक नवी श्रद्धा प्राप्त करून देणे ही त्यांनी आपली जीवनश्रद्धा मानली आहे. तथापि या श्रद्धेचा वाङ्मयीन आविष्कार त्यांनी स्वच्छंदतावादी (रोमँटिक) प्रवृत्तीने केला. त्यामुळेच सामाजिक किंवा व्यक्तिजीवनविषयक प्रश्नांच्या तीव्र जाणिवेतून निर्माण झालेल्या त्यांच्या लेखनात स्वच्छंदतावादी ध्येयवाद आणि भावनापूर्णता आढळते. जीवनासाठी कला या भूमिकेतून जीवनातील सुखदुःखांचा बोध करून देतानाही प्रखर वास्तवाला त्यांनी भावनात्मक आणि कल्पनावादी मुरड घालून त्यांतून सामाजिक उद्बोधन साधण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांच्या साहित्यातील जीवनदर्शनाच्या भेदकतेस मर्यादा पडतात.

तेजस्वी कल्पनाशक्ती आणि तल्लख विचारशक्ती या गुणांना शब्दप्रभुत्वाची जोड मिळाल्याने खांडेकरांची भाषाशैली आलंकारिक आणि सुभाषितात्मक ठरली. मराठी कादंबरीला तंत्रमंत्रदृष्ट्या प्रगल्भ व प्रभावी करण्याचे श्रेय ना. सी. फडक्यांबरोबर खांडेकरांनाही दिले जाते. मराठी कथेला तर त्यांनी नानाविध प्रयोगांनी समृद्ध व संपन्न केले.

समीक्षक म्हणून जीवनासाठी साहित्य या भूमिकेद्वारा त्यांनी साहित्याच्या उच्च ध्येयवादाचा पुरस्कार केला. मराठी साहित्यक्षेत्राविषयी सातत्याने जागरूक राहून त्यांनी साहित्यविषयक अनेक प्रश्नांची व प्रमेयांची उद्बोधक चर्चा केली. कुसुमाग्रज, बोरकर, बाबा आमटे यांच्या काव्यगुणांचा प्रभावी परिचय त्यांनीच पहिल्यांदा आपल्या प्रस्तावनांतून महाराष्ट्राला करून दिला. खांडेकरांना ययाति कादंबरीबद्दल १९७४-७५चे भारतीय ज्ञानपीठाचे एक लाख रुपयांचे पारितोषिक देण्यात आले. मराठी साहित्याच्या अभिवृद्धीसाठी अखंडपणे कार्यरत असलेले एक श्रेष्ठ समर्पित साहित्यिक म्हणून त्यांचे मराठीतील स्थान कायम राहील.

**-सु.रा. चुनेकर**
(मराठी विश्वकोष)

# लेखक, इतिहाससंशोधक यशवंत दिनकर तथा य.दि. फडके

यशवंत दिनकर फडके हे मराठी चरित्रलेखक, इतिहाससंशोधक होते. फडके यांचा व्यासंग व लेखनाचा आवाका अफाट होता. त्यांच्याकडून इंग्रजी तसेच मराठी लेखन झाले आहे. आज त्यांची पुण्यतिथी...



यशवंत फडके यांचा जन्म सोलापूर येथे ३ जानेवारी १९३१ रोजी झाला. त्यांचे वडील स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय होते. स्वातंत्र्य चळवळीमुळे वडिलांचे कुटुंबाकडे दुर्लक्ष होत असल्याने त्यांना शिक्षणासाठी बरीच धडपड करावी लागली. त्यांनी महाविद्यालयापर्यंतचे शिक्षण सोलापूर येथेच घेतले. शालेय शिक्षण घेत असतानाच त्यांनी द्वा.भ. कर्णिक यांच्या 'संग्राम' या वृत्तपत्रात लेखन सुरू केले होते. १९४७ साली मॅट्रिक, १९५१ साली बीए (राज्यशास्त्र) आणि १९५३ साली राज्यशास्त्र विषय घेऊन ते एमए झाले. तल्लख बुद्धी असल्याने त्यांना शासकीय महाविद्यालयात अध्यापनाची संधी मिळाली.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीवर प्रबंध लिहून त्यांनी मुंबई विद्यापीठाची पीएचडी ही पदवी मिळवली. मुंबई विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विभागात, प्रथम अधिव्याख्याता नंतर प्रपाठक (रीडर) म्हणून तसेच पुढे पुणे विद्यापीठात 'महात्मा गांधी अध्यासनाचे' प्राध्यापक म्हणून अध्यापन केले. मुंबईच्या 'टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस' या संस्थेत सामाजिक शास्त्रांचे प्राध्यापक म्हणून अध्यापन केले.

'डॉ. आंबेडकर आणि काळाराम मंदिर सत्याग्रह'; 'डॉ. आंबेडकर आणि इंडियन नॅशनल काँग्रेस' अशी पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. 'शोध बाळगोपाळांचा', 'केशवराव जेधे', 'अण्णासाहेब लठ्ठे', 'कहाणी सुभाषचंद्रांची' इत्यादी पुस्तके त्यांनी लिहिली. त्यांनी लिहिलेले 'आगरकर' हे चरित्र उत्कृष्ट चरित्र मानले जाते. त्यांनी केलेले ललितलेखनही लक्षणीय आहे. 'दृष्टादृष्ट', 'शोधता शोधता', 'व्यक्तिरेखा', 'नाही चिरा, नाही पणती', 'स्मरणरेखा' ही त्यांची ललित पुस्तके प्रसिद्ध आहेत.

'विसाव्या शतकातील महाराष्ट्र'च्या आठ खंडांच्या माध्यमातून त्यांनी एक संशोधक व लेखक म्हणून महाराष्ट्राचा सखोल आढावा घेतला. महाराष्ट्राचा इतिहास (भूतकाळ) व भविष्यकाळ या दृष्टिकोनातून हे त्यांचे बहूमूल्य योगदान आहे.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे ते काही वर्षे अध्यक्ष होते, तर २००० साली बेळगाव साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या 'शोध बाळगोपाळांचा', 'व्यक्ती आणि विचार', 'केशवराव जेधे', 'शोध सावरकरांचा', 'लोकमान्य टिळक', 'क्रांतिकारक' व 'आंबेडकरी चळवळ' या पुस्तकांना महाराष्ट्र राज्याचे पुरस्कार मिळाले आहेत. अशा या थोर इतिहास संशोधकाचे ११ जानेवारी २००८ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

# उपशास्त्रीय व नाट्यसंगीत गायिका आशा खाडिलकर

प्रसिद्ध गायिका आशा खाडिलकर यांचा आज जन्मदिन. ११ जानेवारी १९५५ रोजी सांगलीत त्यांचा जन्म झाला. आशा खाडिलकर म्हणजे गायनातलं मूर्तिमंत चैतन्यतत्त्व, कारण त्या गात असलेलं गाणं कोणत्याही प्रकारांतलं असो, शास्त्रीय संगीत किंवा नाट्यसंगीत, भक्तिसंगीत किंवा अगदी भावगीत... त्यांचं प्रत्येक गाणं प्रचंड ऊर्जेनं भारलेलं असतं. ही ऊर्जा मूळच्या गाण्यापेक्षा आशाताईंच्या अंतरातून आलेली असते. त्यामुळेच आशाताई जेव्हा एखादं गाणं गातात, तेव्हा ते तत्पूर्वी कुणीही गायलेलं असलं तरीही विलक्षण चैतन्यमय भासतं.

अगदी लहान वयातच आशाताईंच्या घरच्यांनी त्यांना पं. बाळकृष्णबुवा मोहिते यांच्याकडे गाणं शिकायला पाठवलं आणि आशाताई गाण्यातच अक्षरशः रूजल्या. तेराव्या वर्षी त्यांनी पहिली मैफल मारली, तर वयाच्या सतराव्या वर्षीच पं. भीमसेन जोशी, गानहिरा हिराबाई बडोदेकर, डॉ. वसंतराव देशपांडे यांच्यासारख्या गायनातील मान्यवरांनी आशाताईंच्या गाण्याला नावाजलं आणि त्यांना पुण्यात मानाचा 'बालगंधर्व पुरस्कार' बहाल केला.

१९७५मध्ये लग्नानंतर मुंबईस स्थलांतर केल्यावर आशाताईंनी ख्यातनाम गायिका माणिक वर्मा यांच्याकडे गायनाचं शिक्षण चालू ठेवलं. पुढच्या काळात त्या ग्वाल्हेर घराण्याचे समर्थ गायक पं. यशवंतबुवा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गायनकलेची आराधना करत होत्या. आशाताईंनी



वेगवेगळ्या संगीत घराण्यांना आपल्या गायनात समाविष्ट करून त्यातून आपलं गाणं अधिक कसदार बनविलं आहे. किराणा घराणं, ग्वाल्हेर घराणं व आग्रा घराणं यांच्या गायनशैलीची अनेक वैशिष्ट्यं आशाताईंच्या गायनात दिसून येतात.

'घेता किती घेशील दो करांनी' या न्यायाने माणिक वर्मा, पं. यशवंतबुवा जोशी, पं. जितेंद्र अभिषेकी, पं. शंकरराव अभ्यंकर अशा विविध संगीत घराण्यातील गुरूंकडून त्यांनी गाण्याची तालीम घेतली. केवळ तालीम घेतली नाही, तर त्या त्या घराण्याची खासियत आपल्या गळ्यात उतरवली आणि आपली अशी एक स्वतंत्र, काहीशी आक्रमक गायनशैली विकसित केली. आशाताईंचं गाणं ऐकताना किराणा, ग्वाल्हेर व आग्रा घराण्याची गानवैशिष्ट्यं आढळून येतात, ती त्यामुळेच. त्यांनी गायलेल्या भावगीतांत याची उत्तम झलक पाहायला मिळते. विशेषतः 'घाई नको बाई अशी, आले रे बकुलफुला' हे गाणं ऐकताना याचं प्रत्यंतर येतं.

आशाताई पारंपरिक मराठी भावगीते, भजने व नाट्यगीतेही तितक्याच प्रभावीपणे सादर करतात. देशोदेशी त्यांचे कार्यक्रम होत असतात. आशाताईंनी संगीतदिग्दर्शन व संगीत रचनाही केल्या आहेत तसेच अनेक बंदिशी रचल्या आहेत. 'संगीत आराधना' व 'संगीत कविराज जयदेव' यांसारख्या नव्या काळातील मराठी संगीतिकांचे त्यांनी संगीत दिग्दर्शन केले आहे. जाहीर कार्यक्रमांच्या जोडीला आशाताईंनी वेगवेगळ्या संकल्पनांवर आधारित कार्यक्रम, उदा. 'होली रंग रंगीले', 'सावन-रंग', 'ऋतु-रंग', 'रचनाकार को प्रणाम' सादर केले आहेत.

१९९४पासून पती माधव खाडिलकर यांच्या सहयोगाने आशाताईंनी ठाणे, मुंबई येथे उत्तुंग सांस्कृतिक परिवार नामक सांस्कृतिक संस्था सुरू केली असून, तिचा उद्देश संगीत, नृत्य, नाट्य व साहित्य विश्वातील नव्या दमाच्या प्रतिभेला आपली कला सादर करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा आहे. ह्या क्षेत्रांत लक्षणीय कामगिरी करणाऱ्यांसाठी ही संस्था 'उत्तुंग पुरस्कार' जाहीर करते. आजवर आशाताईंना अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांत माणिक वर्मा पुरस्कार, पं. कुमार गंधर्व पुरस्कार, संगीत शिरोमणी पुरस्कार अशा मानाच्या अनेक पुरस्कारांचा समावेश आहे.

(माहिती संकलन : संजीव वेलणकर)

# मुरूड आगारात सीएनजी पंपाची प्रतीक्षा



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड एसटी आगारात सीएनजी गॅस पंप सुरू करण्याची मागणी प्रवाशांसह नागरिकांनी केली आहे. या मागणीचा पाठपुरावा करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी ही बाब खासदार सुनील तटकरे यांच्या निदर्शनास आणली असता खासदारांनी तत्परतेने वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत ४ सप्टेंबर २०२५ रोजी या विषयावर बैठक आयोजित केली होती.

या बैठकीत एसटी महामंडळाचे वरिष्ठ अधिकारी, तेल कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहिल्याची माहिती आहे. मुरूड आगारात सीएनजी गॅस पंप तातडीने कार्यान्वित करण्याबाबत ठोस निर्णय या बैठकीत जवळ जवळ झाल्याची माहिती मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसने दिली. अद्याप सीएनजी गॅस पंप मंजुरीची नसल्याने स्थानिक प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे

मुरूड हे कोकणातील एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ असून, ऐतिहासिक जंजिरा किल्ला, पद्मदुर्ग, निसर्गसौंदर्य आणि खाद्य संस्कृती यामुळे दरवर्षी लाखो पर्यटक येथे येतात, मात्र सीएनजी पंपाच्या अभावामुळे एसटी बस गाड्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. सध्या मुरूड आगारातील नव्याने आलेल्या पाच गाड्यांसह इतर ३० ते ३५ बस सीएनजीवर धावत असल्या तरी गॅस भरण्यासाठी अलिबागला जावे लागते. त्यामुळे वेळेचा अपव्यय तर होतोच, शिवाय प्रवाशांचा खोळंबा होतो. परिणामी मुंबई, पुणे येथे जाणाऱ्या प्रवाशांना अर्धा तास नाईलाजास्तव थांबावे लागते . त्यामुळे मुरूड आगारातून बसलेले प्रवासी सलग प्रवास टाळतांना दिसतात. वाहक–चालकांवर अप्रत्यक्ष प्रवासी राग काढतात आणि महत्वाचे म्हणजे प्रवाशी संख्या कमी झाल्याने मुरुड आगाराचे भारमान कमी होते.

एसटी महामंडळाने पर्यावरणपूरक सीएनजी बसेस सुरू केल्या असल्या असून बहुतेक आगारात सीएनजी पंप कार्यान्वित केले आहेत. मुरूड या पर्यटन स्थळी सीएनजी गॅस पंप लवकरात लवकर सुरु करून प्रवाशांना दिलासा द्यावा अशी मागणी केली जात आहे.

मुरूड आगार व्यवस्थापक शिंदे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, जागेची पहाणी करून अधिकारी वर्ग गेले आहेत. त्यांना जागासुद्धा पसंद आली असून गॅस पंप आवश्यकतेची सर्व बाबींची पूर्तता झाली असून लवकरच गॅस पंप होईल, अशी अपेक्षा या वेळी त्यांनी व्यक्त केली.

**पाठपुरावा सुरू असल्याची माहिती**

या वेळी मुरूड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा आराधना मंगेश दांडेकर याना या बाबत विचारणा केली असता, त्यांनी सांगितले कि, मुरूड शहर व ग्रामीण भागातील प्रवासी वर्गाचा त्रास टळावा यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मार्फत खासदार सुनील तटकरे यांच्याशी संपर्क साधून मुरुड आगारात गॅस पंप मागणी करण्यात आली आहे. मुरुड आगारात गॅस पंप होण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून पंप होण्यासाठी सर्व बाबीची पूर्तता झाली असून लवकरच या ठिकाणी गॅस पपं कार्यान्वित झालेला पहावयास मिळेल. यासाठी आमच्या पक्षातील सर्व प्रमुख पदाधिकारी खासदार तटकरे यांच्याकडे पाठपुरावा सुरू असल्याचे या वेळी त्यांनी सांगितले.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिशीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली मिळकत नितीन पुंडलिक चौधरी यांच्या मालकीची आहे. सदरहू मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीच्या मालकी हक्काची पडताळणी करून खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धोदाणी, ता. पनवेल, जि. रायगड**

| गट क्र. व उपविभाग | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|
| ४३/२/अ | ४–४४–००<br>पो.ख. १–१३–००<br>एकूण क्षेत्र ५–५७–०० | ६.८९ |
| पैकी खरेदीखताचे क्षेत्र | ०–४९–००<br>पो.ख. ००–०१–००<br>एकूण क्षेत्र ०–५०–०० | ०.७९ |

सदरहू मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आम्ही सदरहू मिळकतीची वरीलप्रमाणेचे मालकी हक्काची पडताळणी पूर्ण करु व मिळकत बोजारहीत असल्याचे स्पष्ट झाल्यास त्याबाबत मालकी हक्काचा दाखला देण्याची तजविज करु व त्यानंतर आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक: १०.०१.२०२६

**सही/–**
**श्री. राहूल तुलशीराम पाटील**
**(ॲडव्होकेट)**

पत्ता –सुकापूर, नेहा सर्व्हस सेंटर जवळ, ता. पनवेल, जि. रायगड
४१०२०६ मोबाईल नं. ७२०८२३२४४४

# जनतेच्या प्रश्नांसाठी भाजप नेते पंडित पाटील यांची रोहा पंचायत समितीत भेट

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील जनतेने माजी आमदार पंडित पाटील यांच्या माध्यमाने जनता दरबारी नागरिकांनी समस्यांचे आणि तक्रारी केल्या होत्या. त्याबाबत पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांकडून कोणती कारवाई केली. याबाबत आढावा घेण्यासाठी माजी आमदार पंडित पाटील यांनी भेट दिली. या भेटीच्या माध्यमाने तक्रारदारांच्या समस्या थेट पने सोडवण्यासाठी सबंधित अधिकारी यांना कोणत्याही राजकीय नेत्याच्या दाबावर न येता समस्या सोडवण्याच्या त्यांनी सूचना दिल्या.

माजी आमदार पंडित पाटील यांनी ९ जानेवारीला दुपारी तीन वाजता



तक्रारदारांसोबत पंचायत समितीला थेट भेट दिली. परंतु शुक्रवार असल्याने बरेच अधिकारी आणि इंजिनिअर दुपारी दोन नंतर गैरहजर होते. त्यावेळी उपस्थित नागरिकांनी रोहा तालुक्यातील काही शासकीय कार्यालयातील कर्मचारी आणि अधिकारी शनिवारी सुट्टी असल्याने शुक्रवारीच कार्यालय सोडून जात असल्याने नागरिकांचे कामे वेळेत पूर्ण होत नाहीत अशी तक्रार केली. त्याचप्रमाणे रोहा तालुक्यातील अर्धवट राहिलेले जल जीवन योजना, घरकुल योजना, अंगणवाड्या आणि शाळांचे कामे, तसेच अधिकाऱ्यांच्या दिरंगाईमुळे अडकून राहिलेले विकासकामे याबाबत कारणे विचारून सदर कामे लवकर पूर्ण करण्यास माजी आमदार पंडित पाटील यांनी सांगितले.

या मीटिंगमध्ये उपस्थित नागरिक आणि कार्यकर्ते यांनी बेजबाबदार सरकारी कर्मचारी यांच्या विरोधात वेळेत आवाज उठवून समस्या सोडवल्या पाहिजेत, अशी सूचना केली. या वेळी उपस्थित अधिकारी यांच्यासोबत चर्चा करून जनतेची समस्या दूर करण्यासाठी जनतेला सहकार्य करण्याची सूचना केली.

## जाहिर निविदा

इमरातींच्या पुनर्विकासासाठी 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार' निवडकरणेसाठी ओम सह. गृह. संस्था मर्या. (इमारत क्र. ई १ – ११ ते ई १ – १५) भूखंड क्रमांक ३, सेक्टर १४, नवीन पनवेल (पू.) ४१० २०६ (१५० सदनिका) भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ –३८०४.२३८चौरस मीटर.

महाराष्ट्र सरकारच्या निर्देशांनुसार इमारतींच्या पुनर्विकासासाठी विकासक निवडण्यासाठी अनुभवी 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारां'कडून संस्थात्मक मालमत्तेच्या तपशीलांसह स्वारस्य असणाऱ्यांसाठी आमंत्रित करत आहे.

आपल्या 'प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारां'ची तपशीलवार माहिती संस्थेचे पदाधिकारी अध्यक्ष श्री. विश्वास त्रंबक पाटील (भ्रमणध्वनी – ९९२०१९२४५७), सचिव श्री. रवींद्रनाथ गणपती निंबाळकर (भ्रमणध्वनी – ९८२०४९०८६९), कोषाध्यक्ष श्री. अनंत गोपाळ कोळी (भ्रमणध्वनी – ९८२०३९२४०२), यांच्याशी संपर्क साधून २५ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत, निविदा शुल्क रु.१०,०००/– (परत न करण्यायोग्य) च्या डिमांड ड्राफ्टसह द्यावेत.

सोसायटी कोणतेही कारण न देता कोणत्याही किंवा सर्व ऑफर स्वीकारण्याचा/नाकारण्याचा अधिकार राखून ठेवत आहे.

**दिनांक: १०.०१.२०२६**
**स्थळ : पनवेल**

**सही/–**
**माननीय सचिव**
**ओम सह. गृह. संस्था मर्या.**
**प्लॉट क्रमांक ३, कलम १४,**
**नवीन पनवेल (पू) ४१० २०६**

## जाहीर नोटीस

प्रो. जमा.

कोर्ट
अर्जदाराचे वकील– ॲड.जे.बी. आपटे
नि ९/ड
ने ता २१/२/२०२६
दिवाणी चौकशी अर्ज क्र.१३५४/२०२५

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व स्तर) यांचे कोर्टात**

सौ. अदित्ती राजेश आपटे ........अर्जदार
व इत्तर
विरूध्द
कोणीही नाही ..........सामनेवाले

ज्याअर्थी शांतिकुमार वसंत चुनेकर हे दिनांक २६/१०/२०२४ रोजी मयत झाले असुन अर्जदार क्र. १ सौ. अदिती राजेश आपटे (लग्नापुर्वीची अदिती शांतिकुमार चुनेकर) रा. – ए ३०३, दि. पर्ल को. ऑप.हौ. सोसा. विचुंबे, ता. पनवेल, जि. रायगड पिन ४१० २०६ व अर्जदार क्र. २ सौ. प्रचिती ओमकार देशपांडे (लग्नापुर्वीची प्रचिती शांतिकुमार चुनेकर, रा. सी विंग ३०३, निंबेश्वर गार्डन को.ऑप.हौ. सोसा. ऊसर्ली रोड पनवेल ता. पनवेल, जि. रायगड. पिन – ४१० २०६ यांनी मे. कोर्टाकडे सदरहु मयत शांतिकुमार वसंत चुनेकर यांच्या ५० टक्के हिश्याच्या खालील वर्णनाच्या मिळकतींबाबत वारसाचे सर्टिफिकेट मिळावे म्हणुन अर्ज केला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

फ्लॅट क्र. ४०३, क्षेत्र ४५.८१ स्वे.मी. (कारपेट), चौथा मजला, सी विंग,
दि पर्ल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सर्व्हे नं. १३७, १३८, १४०/१
गांव मौजे विचुंबे, ता. पनवेल, जि. रायगड.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीरनोटीस प्रसिध्द झाले तारखेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजुन हे कोर्ट सदरहु अर्जदारांना त्यांचे हक्कांबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहु मयत शांतिकुमार वसंत चुनेकर यांचे वारसाचे सर्टिफिकेट देईल. तारीख ६ माहे डिसेंबर सन २०२६

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा. अधिक्षक दिवाणी**
**न्यायालय व स्तर पनवेल**

# जि.प., पं.स. निवडणूकसंदर्भात खालापुरात भाजपची बैठक



**खालापूर : प्रतिनिधी**

आगामी काळात होऊ घातलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी खालापूर तालुका कार्यकर्त्यांची आढावा बैठक झाली.

या वेळी भाजपा जिल्हा सरचिटणीस दिपक बेहरे, उद्योग आघाडी जिल्हा संयोजक विठ्ठल मोरे, खालापूर मंडळ अध्यक्ष सनी यादव आदींनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या वेळी भाजप जिल्हा सरचिटणीस दिपक बेहरे, उद्योग आघाडी जिल्हा संयोजक विठ्ठल मोरे, खालापूर मंडल अध्यक्ष सनी यादव, खालापूर तालुका महिला मोर्चा अध्यक्षा श्वेताताई मनवे, माजी जिल्हा परिषद सदस्या वत्सला ताई मोरे, सुजाताताई दळवी,प्रसाद पाटील, रविंद्र पाटील, आबा देशमुख, हरीभाऊ जाधव, जगदीश आगिवले, नागेश पाटील, हेमंत पाटील, अतुल बडगुजर, अजित देशमुख,अनिल जाधव, भरत महाडिक, संतोष तांडेल, दिपक जगताप भाजपा सोशल मीडिया प्रमुख, विकास विकास रसाळ, प्रवीण मनवे, जयेश पाटील, जयेंद्र पाटील, दादा मराजगे, मोहन घाडगे, यशोदा मोरे, निकिता हेलांडे,रोहिणी पाटील, सुप्रिया तटकरे, प्रसाद देशमुख, विलास पाटील, रवी मोरे, सचिन मोरे, विकी मोरे आदि कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

# नागोठण्यात आज भाजपचा संघटन मेळावा

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथे रविवार, ११ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजता शिव गणेश सभागृहा समोरील मोदी ग्राउंड वर जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीची महत्त्वपूर्ण बैठक संघटन मेळावा आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास नागोठणे शहरातील बूथ अध्यक्ष, कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती तालुका महामंत्री आनंद लाड यांनी दिली आहे.

या कार्यक्रमाला भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष खासदार धैर्यशिल पाटील, आमदार रविशेठ पाटील, जिल्हा महामंत्री सतीश धारप,महिला जिल्हाध्यक्ष चित्राताई पाटील, आस्वाद पाटील, जिल्हा महामंत्री वैकुंठशेठ पाटील, मारुती देवरे, अनंत वाघ, महादेव मोहिते, जिल्हा उपाध्यक्ष सोपान जांबेकर, श्रेया कुंटे, महेश ठाकूर आदी उपस्थित राहणार आहेत.

## मा. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल तालुका

**कृषि उत्पन्न बाजार समिती, सहकार नगर, पहिला मजला, रायगड बाजाराच्या बाजूला, पनवेल, जि. रायगड ४१० २०६**

दुरध्वनी क्रमांक : ०२२७४५२९८३ | email : arcspanvelrediffmail.com
जावक क्र/:– ००५१/२०२६ | दिनांक : ०९/०१/२०२६

### जाहीर नोटीस

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा नोटीस महात्मा फुले को. ऑप. के. सो. लि., पनवेल या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्ती विरूध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याने नमूद करून वसुली प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापि खालील नमूद व्यक्तींना सुनावणी नोटीसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणणे दाखल करण्यासाठी जाहीर नोटीस देण्यात येत आहे. या जाहीर नोटीसीव्दारे आपणांस पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दिनांक २८/०१/२०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता ठेवण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनिधी मार्फत उपस्थित राहवे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निर्णय दिला जाईल.

| अ.क्र. | दावा क्र. | प्रतिवादीचे नाव | पत्ता | दावा रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | | सौ. मीना मनोज साबळे. (कर्जदार) | मु. पो. करंजाडे, घर नं. १०२, हनुमान मंदिरा जवळ, पनवेल, जि. रायगड–४१०२०६. | ५७,५०८/– |
| | | श्री. लक्ष्मण मन्नू चहेरा (सौ. मीना मनोज साबळे, कर्जदार यांचे जामिनदार) | लोटस बिल्डिंग, ए विंग, रूम नं. ५०२, चॅनल उपवन जवळ, साईनगर ठाणा नाका, पनवेल. | |
| | | श्री. विकास हिराजी म्हात्रे (सौ. मीना मनोज साबळे, कर्जदार यांचे जामिनदार) | फ्लॅट नं. ७०/४, से १३, सिडको कॉलनी, तेरणा हॉस्पिटल जवळ, न्यू पनवेल ४१०२०६. | |
| २. | | सौ. बबिता ओमप्रकाश लोमारे. (कर्जदार) | साई दर्शन बिल्डिंग, फ्लॅट नं. १०४, प्लॉट नं. ७४, से.२/अ, त्रिवेणीधाम मंदिराच्या समोर, करंजाडे, पनवेल, | ८२,५६५/– |
| | | श्री. ओमप्रकाश शिवराम लोमारे. (सौ. बबिता ओमप्रकाश लोमारे, कर्जदार यांचे जामिनदार) | साई दर्शन बिल्डिंग, फ्लॅट नं. १०४, प्लॉट नं. ७४, से. २/अ, त्रिवेणीधाम मंदिराच्या समोर, करंजाडे, पनवेल, | |
| | | श्री. प्रशांत विष्णू कर्पे. (सौ. बबिता ओमप्रकाश लोमारे, कर्जदार यांचे जामिनदार) | प्लॉट नं. ९३३, जनाबाई निवास, टपाल नाका, शनी मंदिराच्या समोर, एम.जी. रोड, पनवेल, | |
| ३. | | श्री. ओमप्रकाश शिवराम लोमारे (कर्जदार) | साई दर्शन बिल्डिंग, फ्लॅट नं. १०४, प्लॉट नं. ७४, से. २/अ, त्रिवेणीधाम मंदिराच्या समोर, करंजाडे, पनवेल, | ८५,३२६/– |
| | | कु. दिपाली कृष्णा थोरात. (श्री. ओमप्रकाश शिवराम लोमारे, कर्जदार यांचे जामिनदार) | ऋषिकेष अपार्टमेंट, प्लॉट नं.३६ ते ३९, फ्लॅट नं. २०१ सी विंग, से–१०, डी.अे.व्ही. शाळे जवळ, न्यू पनवेल. | |
| | | श्री. शुभंम उमेश अलोने. (श्री. ओमप्रकाश शिवराम लोमारे, कर्जदार यांचे जामिनदार) | व्दारा शामराव उमाजी ठाकरे, फ्लॅट नं. १०२ /अे, गणेश विहार हौ. सोसा., प्लॉट नं. १२८, से४,करंजाडे,. | |
| ४. | | सौ. अंजली अजय खोत. (कर्जदार) | खोली क्र. ९२०/बी, कुडावे गाव, मराठी शाळेजवळ पनवेल, जि. रायगड– ४१०२०६ | ७४,७५७/– |
| | | श्री. अजय यशवंत खोत. (सौ. अंजली अजय खोत, कर्जदार यांचे जामिनदार) | खोली क. ९२०/बी, कुडावे गाव, मराठी शाळेजवळ, पनवेल, जि. रायगड–४१०२०६ | |
| | | श्री. रघुनंदन श्रीराम कोंडीलकर. (सौ. अंजली अजय खोत, कर्जदार यांचे जामिनदार) | खोली क्र. ३०५, कुडावे गाव, मराठी शाळेजवळ, झपाटेश्वर मंदिरा जवळ, पनवेल ४१० २०६. | |
| ५. | | श्री. अजय यशवंत खोत. (कर्जदार) | खोली क. ९२०/बी, कुडावे गाव, मराठी शाळेजवळ पनवेल, जि. रायगड–४१०२०६ | ९८,२४७/– |
| | | श्री. रघुनंदन श्रीराम कोंडीलकर. (श्री. अजय यशवंत खोत, कर्जदार यांचे जामिनदार) | खोली क. ३०५, कुडावे गाव, मराठी शाळेजवळ, झपाटेश्वर मंदिरा जवळ, पनवेल ४१० २०६. | |
| | | श्री. दिपक शिवराम मुळम. (श्री. अजय यशवंत खोत, कर्जदार यांचे जामिनदार) | रूम नं. अे/१०१, श्री. अनिरूध्द अपार्टमेंट, से ९, प्लॉट नं. ३४, कामोठे, पनवेल–४१०२०९ | |
| ६. | | श्री. दिपक शिवराम मुळम. (कर्जदार) | रूम नं. अे/१०१, श्री. अनिरूध्द अपार्टमेंट, से– ९, प्लॉट नं. ३४, कामोठे, पनवेल–४१०२०९ | १,०४,६६५/– |
| | | श्री. संकेश विजय कांबळे. (श्री. दिपक शिवराम मुळम, कर्जदार यांचे जामिनदार) | शिवम कॉलनी, बी/२, रूम नं. ९०६४, शिवमंदिर रोड, दुर्गामाता मंदिराजवळ, बारकू पाडा, अंबरनाथ (पूर्व). | |
| | | श्री. सुरेश गोपाल झुंज. (श्री. दिपक शिवराम मुळम, कर्जदार यांचे जामिनदार ) | महाराष्ट्र हौसिंग बोर्ड बैठी चाळ, चाळ नं. ८०, रूम नं.५०९, मंगलेश्वर मंदिराजवळ, म्हाडाच्या पाण्याची टाकीच्या बाजूला, अंबरनाथ ४२१ ५०१. | |
| ७. | | श्री. किशोर शिवराम मुळम. (कर्जदार) | रूम नं. अे/१०१, श्री. अनिरूध्द अपार्टमेंट, से – ९, प्लॉट नं. ३४, कामोठे, पनवेल–४१०२०९ | १,१६,०६०/– |
| | | सौ. संजना संदीप खैरे. (श्री. किशोर शिवराम मुळम, कर्जदार यांचे जामिनदार) | फ्लॅट नं. डी/४०१, साई प्रितम हौ. सोसायटी, से–१०, प्लॉट नं. ३४, कामोठे – ४१०२०९. | |
| | | श्री. गोपीप्रसाद मोतीलाल अलपुरिया.. (श्री. किशोर शिवराम मुळम, कर्जदार यांचे जामिनदार) | ५१४, आत्माराम नगर चाळ, मुरबाड रोड, वरप गाव कल्याण (पश्चिम), कल्याण ४२१३०१. | |
| ८. | | श्री. संदिप राजाराम पवार. (कर्जदार) | हाऊस नं. १८०, रूम नं. २०१, तुलसी निवास, शिवसेना ऑफिस जवळ, सेक्टर ५, (डि मार्ट रोड जुईनगर), सानपाडा, नवी मुंबई. | १,२३,५४४/– |
| | | श्री. परेश नामदेव पाटील. (श्री. संदिप राजाराम पवार, कर्जदार यांचे जामिनदार) | रूम नं. ८०, बिल्डींग नं. अे/७, एम.सी.जी.बी., ए.डी.एम.टी. बिल्डींग, भांडूप कॉम्प्लेक्स, मुंलूड (पश्चिम), मुबंई ४०० ०८२ | |
| | | श्री. विठ्ठल रघुनाथ कुडतरकर. (श्री. संदिप राजाराम पवार, कर्जदार यांचे जामिनदार) | डी १/८, भारत को.ऑप. हौसिंग सोसायटी, से २५ स्वामी समर्थ मठासमोर, जुईनगर, नवी मुंबई. | |
| ९. | | श्री. महेश लालचंद्र सोनकर. (कर्जदार) | एम २, एस.एच ०४, युंगातक हौसिंग सोसायटी, शिकारी बिल्डींग जवळ, चिपळे गाव, पनवेल. | १,०३,५४०/– |
| | | श्री. सत्येंद्र घनश्याम सोनकर. (श्री. महेश लालचंद्र सोनकर, कर्जदार यांचे जामिनदार) | एफ/३२/३, अे टाईप, सेक्टर –१३, चंद्रभागा असोशियन, काली माता मंदिर जवळ, नविन पनवेल. | |
| | | श्री. ब्रिजेश सुरेश सोनकर. (श्री. महेश लालचंद्र सोनकर, कर्जदार यांचे जामिनदार) | घर नं. २०४, सनशाईन वंसुधरा बिल्डींग, प्लॉट नं. ९९७/१, रोहीदास वाडा, टपाल नाका, जुने पनवेल. | |
| १०. | | श्री. नितीन पांडुरंग मनवळ. (कर्जदार) | फ्लॅट नं. ६०१, राऊत आर्केड, मोहन पाम जवळ, शिरगाव, बदलापूर – ४२१ ५०३ | १,१४,५३७/– |
| | | श्री. किसन लक्ष्मण वाघ (श्री. नितीन पांडुरंग मनवळ, कर्जदार यांचे जामिनदार) | फ्लॅट नं. ३०२, ए विंग, कृष्णा अपार्टमेंट, कैलास नगर वालावली रोड, कॅन्सर हॉस्पिटल जवळ, बदलापूर – प. | |
| | | सौ. ज्योती देविदास हाडवळे. (श्री. नितीन पांडुरंग मनवळ, कर्जदार यांचे जामिनदार) | फ्लॅट नं. बी । ४०५, सद्गुरू रेसिडेन्सी, मराठी शाळे जवळ, हनुमान मंदिरा समोर, वालिवली, बदलापूर (प.), बदलापूर – ४२१ ५०३. | |
| ११. | | श्री. धनंजय किशोर म्हात्रे. (कर्जदार) | घर नं. ३००, राधोकृपा, दापोली गाव, गौरी मेडिकलच्या बाजुला, मारूती मंदिराजवळ, पनवेल, रायगड ४१०२०६. | १,०५,५७२/– |
| | | श्री. किशोर हरिश्चंद्र चव्हाण. (श्री. धनंजय किशोर म्हात्रे, कर्जदार यांचे जामिनदार) | आंनदीबाई निवास, रूम नं. १०३, तळमजला, मु. दापोलीगाव, विष्णू मंदिराजवळ, पनवेल. | |
| | | श्री. सचिन लहु नालकोल. (श्री. धनंजय किशोर म्हात्रे, कर्जदार यांचे जामिनदार) | फ्लॅट नं. बी/१०२, नेवाळे गाव, भैरवनाथ कॉम्पलेक्स गावदेवी दाबा जवळ, पनवेल, रायगड. | |
| १२. | | श्री. बिपीन बबन शेटे. (कर्जदार) | फ्लॅट नं. २०७, बी विंग, दाता रेसिडन्सी, सेंट मेरी शाळेजवळ, खालापूर, रायगड– ४१० २०३. | ९२,१३६/– |
| | | श्री. विनोद रमेश पाटील. (श्री. बिपीन बबन शेटे, कर्जदार यांचे जामिनदार) | मु. हेमनगर, हनुमान मंदिर जवळ, पो. कुसुंबळे, ता. अलिबाग, जि. रायगड. | |
| | | श्री. सद्दाम जुम्मादिन पटेल. (श्री. बिपीन बबन शेटे, कर्जदार यांचे जामिनदार | फ्लॅट नं. ४०२, श्री. अनिरुध्द अपार्टमेंट, प्लॉट नं. ३४, सेक्टर–९, नवी मुंबई, कामोठे ४१०२०९. | |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली असे.

**स्थळ : पनवेल**
**दिनांक : ०९/०१/२०२६**

**सही/–**
**(श्रीम. भारती काटुळे )**
**सहाय्यक निबंधक सहकारी**
**संस्था पनवेल, जि. रायगड**

# जी.एच. पाटील यांची शोकसभा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा परिषद सेवा निवृत्त संघटना अध्यक्ष जी. एच. पाटील यांचे २७ डिसेंबर २०२५ रोजी निधन झाले. त्यांना श्रधांजली वाहण्यासाठी अलिबागमधील पंचायत समितीच्या सभागृहात शोकसभेचे आयोजन शुक्रवारी (दि.९) संघटनेच्या वतीने करण्यात आले.

या वेळी ॲड. बाबुराव पुजारवाड, द्वारकानाथ नाईक, सुरेश म्हात्रे, किशोर घरत, ए.बी. पाटील, ए. एम. पाटील, मंगेश पाटील, राम लाड, प्रकाश काळे, डॉ. राजेंद्र म्हात्रे, शुभदा पाटील, चारुलता कोरडे, सुविधा म्हात्रे, उल्हास इंदुलकर, महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद रायगड जिल्हा शाखेचे सचिव संतोष साळावकर, सुदिन कांबळे, सुरेश जांभळे, अंजू वर्तक, रश्मी कांबळे, अशोक कुकलारे, अमर ठोंबरे, किरण रावळ, समीर अधिकारी, झेंडेकर, उल्हास इंदुलकर, रघु भोसले, श्री बागुल, राम लाड, सुरेश ठाकूर, सुरेश वर्तक,डॉ. रवि पाटील, रवी पाटील आदी उपस्थित होते.

# गोळेगणी येथे लोकसहभागातून वनराई बंधाऱ्याची निर्मिती

**पोलादपूर : प्रतिनिधी**

गोळेगणी येथे उन्हाळयामध्ये पाणी टंचाईवर मात करण्यासाठी सर्व ग्रामस्थांनी एकत्र येऊन लोकसहभागातून तसेच श्रमदानातून पंधरा मीटर लांबीचा वनराई बंधारा बांधला.

या बंधाऱ्याचा उपयोग गावाची पिण्याच्या पाण्याच्या विहिरीची पाणीपातळी वाढविण्यासाठी तसेच गावातील गुरे जनावरांसाठी पाण्याची सोय होणार असून गावातील महिलांना कपडे धुण्यासाठीदेखील होणार आहे. या वनराई बंधाऱ्यामुळे बंधाऱ्याच्या बाजूला असलेल्या आंब्याच्या बागांना पाणी उपलब्ध होणार आहे.

हा बंधारा बांधण्यासाठी कृषि विभागाचे मार्गदर्शन लाभले तसेच ग्राम पंचायत अधिकारी यांचे सहकार्य लाभले बंधारा बांधतेवेळी सरपंच प्रकाश दळवी, तालुका कृषि अधिकारी सुनील घनवट, उपकृषी अधिकारी श्रीरंग मोरे, सहाय्यक कृषि अधिकारी दादासाहेब खारतोडे, ग्राम पंचायत अधिकारी संतोष मोरे, माजी उपसरपंच ज्ञानेश्वर मोरे, शेखर येरुणकर, दिपक सुर्वे, जन्नी रामेश्वर गटाचे अध्यक्ष प्रकाश मोरे, प्रभाकर पवार व मोठया संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



## जाहीर नोटीस

प्रो. जमा.

मा. खंडारे साहेब कोर्ट
अर्जदाराचे वकील– ॲड.जे.बी. आपटे
नि ३३/ड
ने ता ०७/०२/२०२६
दिवाणी चौकशी अर्ज क्र.२३२/२०१८

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे कोर्टात**

१. सौ. स्नेहा संजय वैद्य वय वर्षे सु.५५,
धंदा–घरकाम, रा. श्रीमंगल कार्यालय साळगांवकर
कंपाऊंड, गणपती मंदीर जवळ,
मु.पो.ता.दापोली, जि. रत्नागिरी
२. सौ. सुचेता संजय जोशी .......अर्जदार
वय वर्षे सु. ५७, धंदा–घरकाम, रा. यशवंत
/३ ब, ओम सिध्दराज को. ऑप. सोसायटी,
अभिनव नगर जवळ, बोरीवली पुर्व, मुंबई

विरूध्द
कोणीही नाही ..........सामनेवाले

ज्याअर्थी कै. विष्णु गणेश बापट हे दिनांक २९/०९/१९७१ रोजी व कै. नरसिंह विष्णु बापट हे दिनांक १२/११/२००६ रोजी मुंबई येथे मृत्युपावले असुन अर्जदार स्नेहा संजय वैद्य व सुवेता संजय जोशी रा. अनुक्रमे दापोली, जि. रत्नागिरी व बोरीवली पुर्व मुंबई यांनी कोर्टास सदरहु मयत विष्णु गणेश बापट व मयत नरसिंह विष्णु बापट यांच्या खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वारसांचे सर्टीफिकेट मिळावे म्हणुन अर्ज केला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. शिरवली, ता. पनवेल, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| अनु. क्र. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र एकर गुंठे | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| १. | ३० नविन गट. नं. २५ | – | ३०–३७–०<br>पो.ख. ७–३–०<br>एकुण ३८–०–० | २४–१४ |
| २. | २५ | २ | १२–०–० | २२–८७ |
| ३. | २९ | | २८–२८–०<br>पो.ख. ६–२१–०<br>एकुण ३४–४९–०<br>(३५–९–०) | १८–१२ |
| ४. | ३४ | | ३४–२४–०<br>पो.ख. ८–०–०<br>एकुण ४२–२४–० | २२–१२ |
| ५. | ४६ | २ | ०–१४–०<br>पो.ख. ०–२–०<br>एकुण ०–१६–० | ०–४–० |
| ६. | ३२ | | १६–३९–०<br>पो.ख. ३–३६–०<br>एकुण २०–३५–० | १०–१४ |
| ७. | ७४ | १ | ०–३६–०<br>पो.ख. ०–१–०<br>एकुण ०–३७–० | ०–१४–६ |
| ८. | ३१ | | २२–३४–०<br>पो.ख. ०–२९–०<br>एकुण २३–२३–० | २०–१२ |
| ९. | १३ | | ०–९ – ० | ०–३–६ |
| १०. | ६४ | | ० – २४– ० | ०–१० |

मौजे पालेखुर्द (नविन महसुली गाव देवीचा पाडा/पाले) येथील सर्व्हे नं. ३२, हिस्सा नं. १/ब व सर्व्हे नं. ९९–हिस्सा नं. १ या मिळकती आहेत.

त्यापेक्षा सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ही जाहीरनोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसांचे आत या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजुन हे कोर्ट सदरहु अर्जदारांना त्यांचे हक्कांबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्यांना सदरहु मयत विष्णु गणेश बापट व मयत नरसिंह विष्णु बापट यांचे वारसाचे सर्टीफिकेट देईल, तारीख २३ माहे डिसेंबर सन २०२५.

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहा. अधिक्षक दिवाणी**
**न्यायालय व स्तर पनवेल**

# विकासकामांच्या जोरावर आम्ही मोठ्या फरकाने विजयी होऊ!

## प्रभाग १६मधील महायुतीच्या उमेदवारांचा विश्वास



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रभागात केलेल्या मोठ्या विकासकामामुळेच आम्ही मोठ्या फरकाने विजयी होऊ असा आशावाद पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या प्रभाग क्रमांक १६ चे महायुतीचे उमेदवार पहिल्या महिला महापौर डॉ. कविता किशोर चौतमोल, संतोष जी.शेट्टी, राजश्री महेंद्र वावेकर, समीर बाळासाहेब ठाकूर यांनी आपल्या प्रचारार्थ रॅलीच्यावेळी व्यक्त केला.

प्रभाग क्रमांक १६ हा भाजपचा बालेकिल्ला, भाजपची ताकद असलेला प्रभाग, सर्वाधिक मताधिक्य देणारा प्रभाग.या प्रभागात केलेल्या अनेक विकास कामांमुळेच प्रचारादरम्यान उत्तम प्रतिसाद उमेदवारांना मिळत आहे, त्यामुळे याही निवडणुकीत मोठ्या फरकाने विजय होऊ असा विश्वास या उमेदवारांनी बोलताना व्यक्त केला.

या वेळी डॉ.कविता किशोर चौतमोल यांनी, २०१७ ते २०२२ या कालावधीत या प्रभागात अनेक विकासाची कामे केली आहेत. सिडकोकडून भूखंडाचे हस्तांतरण, रस्ते दुरुस्ती,ड्रेनेज लाईन,घनकचरा व्यवस्थापन, विविध ठिकाणच्या बगीच्यांमध्ये खेळणी-ओपन जिम, स्वच्छतागृहे, वेंगसरकर आंतरराष्ट्रीय क्रिकेट कॅडमी,प्राथमिक आरोग्य केंद्रे, पाण्याचे व्यवस्थापन आदि कामे या प्रभागात आम्ही करू शकलो. या निवडणुकीकरता पक्षाने आम्हाला पुन्हा संधी दिली आहे, ती आम्ही केलेल्या विकास कामांमुळेच.

संतोष जी.शेट्टी यांनी, प्रभाग १६ हा भाजपचा बालेकिल्ला आहे. कुठल्याही निवडणुका झाल्या. त्या निवडणुकीमध्ये या प्रभागामधून भाजपला मताधिक्य मिळवून दिलेले आहे.या प्रभागात पिण्याच्या पाण्यासाठी उपोषण करावे लागले, त्यानंतर ४६० कोटीची निविदा काढण्यात आली. विसर्जन तलाव, वेंगसरकर आंतरराष्ट्रीय क्रीडा अकॅडमी त्याचबरोबर कोरोना काळात केलेली मदत, भव्य स्वरूपात नवरात्र उत्सव, गणेश विसर्जन तलावा ठिकाणी गणेश भक्तांचे स्वागत, छटपूजा, बगीचे, रस्ते आदी मोठ्या प्रमाणात विकासकामे या प्रभागात केली आहेत. प्रभागातील विरोधक हे फक्त सोशल मीडियावर दिसतात. भाजपाचे पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली या प्रभागात आम्ही विकासकामे करत असल्याची त्यांनी सांगितले.

राजश्री महेंद्र वावेकर यांनी, प्रचार करताना जनतेचा, मतदारांचा आम्हाला अतिउत्तम प्रतिसाद आहे. विकासकामे केल्यामुळेच मतदार आमचे उत्स्फूर्तपणे स्वागत करत आहेत. पक्षाने पुन्हा एकदा निवडणुकीसाठी संधी दिल्याने नाही निवडणुकीत आमचा मोठा विजय होईल असे त्यांनी सांगितले.

समीर बाळाशेठ ठाकूर यांनी, प्रभागात आम्ही केलेली कामे बोलतात. विरोधकांनी कुठलीही विकास कामे केलेली नाहीत.केलेल्या विकास कामामुळेच या प्रभागात जनतेला, मतदारांना भाजप हाच पक्ष हवा आहे, असे सांगितले.

## मुख्य निवडणूक निरीक्षकांची माध्यम संनियत्रण कक्षास भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माध्यम प्रमाणन करण्यासाठी महापालिकेच्या मुख्यालयात माध्यम प्रमाणन व संनियंत्रण कक्ष उभारण्यात आला आहे. या कक्षास मुख्य निवडणूक निरीक्षक कैलास पगारे (भाप्रसे) व सहाय्यक निवडणूक निरीक्षक मनिषा कुंभारे यांनी बुधवारी भेट दिली.

या वेळी निवडणुक अधिकारी मंगेश चितळे व महापालिका अधिकारी उपस्थित होते. या वेळी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण कक्षामधील कामकाजाची त्यांनी माहिती घेतली. या वेळी त्यांनी निवडणूक काळात दैनंदिन येणाऱ्या बातम्या, दिल्या जाणाऱ्या प्रेसनोट यांचे अवलोकन केले.

माध्यम पूर्व प्रमाणान प्रक्रियेची माहिती घेऊन, आतापर्यंत देण्यात आलेल्या प्रमाणपत्रांची पहाणी केली. तसेच टि.व्हीवरील येणाऱ्या बातम्या, सोशल मिडीयावरील दृकश्राव्य जाहिरती तपासणी कशा पध्दतीने केली जाते याची माहिती घेतली. तसेच पेड न्यूजबाबत माहिती घेतली.

## पत्रकारांसाठी सुरक्षा व सन्मान उपक्रम



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पत्रकार दीपक जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत पत्रकार दिनाचे औचित्य साधून खालापूर पोलीस ठाणे येथे विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.या उपक्रमांतर्गत पत्रकारांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत संरक्षणात्मक हेल्मेट तसेच दैनंदिन पत्रकारितेसाठी उपयुक्त डायरी व पेनचे वाटप करण्यात आले.

पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून ओळखला जातो. समाजातील वास्तव, समस्या, अन्याय, भ्रष्टाचार तसेच विकासकामांची माहिती निर्भीडपणे जनतेपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य पत्रकार सातत्याने करत असतात. वार्तांकन करताना अनेकदा अपघातप्रवण ठिकाणी, तणावपूर्ण वातावरणात किंवा प्रतिकूल परिस्थितीत काम करावे लागते. विशेषतः दुचाकीवरून प्रवास करून वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न नेहमीच ऐरणीवर असतो. ही बाब लक्षात घेऊन पत्रकार दीपक जगताप यांनी वाढदिवस समाजोपयोगी व पत्रकारहिताचा उपक्रम राबविण्याचा निर्णय घेतला.

सूत्रसंचालन राणे सर यांनी केले. यावेळी संकेत घेवारे, मनोज कळमकर, प्रशांत गोपाळे, भाई ओव्हाळ, राकेश खराडे, अर्जुन कदम, प्रसाद अटक, सचिन यादव, राजशेखर परब, किशोरीताई चेऊलकर, सारिका सावंत, संतोषी म्हात्रे, सुधीर देशमुख, प्रवीण कोल्हे, देवा पवार, सतीश शेवाळे, समाधान दिसले, विशाल वाघमारे, संदीप ओव्हाळ, अमोल सांगळे, एस. टी. पाटील आदी पत्रकार व मान्यवर उपस्थित होते. सचिन पवार (पोलीस निरीक्षक), मानसी कांबळे, विठ्ठल मोरे (भाजप कामगार जिल्हा आघाडी संयोजक), रोशना मोडवे (नगराध्यक्षा, खालापूर नगर पंचायत), किशोर पवार (सभापती), विकास जगताप (कोकण विभाग अध्यक्ष), गौतम वाघ (कोकण विभाग उपाध्यक्ष) यांनी उपस्थिती दर्शवून उपक्रमाचे कौतुक केले.

## निवडक

### जयंतीलाल पंड्या यांचा सत्कार

**पनवेल :** येथील कर्नाळा हास्य क्लबचे ज्येष्ठ सभासद जयंतीलाल पंड्या यांचा ७५वा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा झाला. यानिमित्त पंड्या यांचा सत्कार करण्यात आला. या अमृत महोत्सवप्रसंगी हास्य प्रशिक्षक मधुकर नाझरे यांच्यासोबत शशिकांत वाळुंज, आर.जी. पाटील, रा.शं. ताकमोगे, प्रमोद बांदल, रवी देसाई, प्रभाकर पानारे, नानालाल पोपट, महेंद्र जेठवा व गजानन भगत हे हास्य क्लब सदस्य उपस्थित होते. रोज सकाळी सहा ते सात या वेळात तालुका क्रीडा संकुलाच्या मैदानावर नियमितपणे हास्य क्लबची प्रात्यक्षिके सुरू असतात.



### रमेश भोळे यांना अवॉर्ड

**पनवेल :** येथील ज्येष्ठ पत्रकार व साप्ताहिक रसायनी टाइम्सचे सहसंपादक रमेश भोळे यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाच्या वतीने ६ जानेवारी पत्रकार दिनाचे औचित साधून शिर्डी येथे एका भव्य कार्यक्रमात कार्यक्रमात इंटरनॅशनल अचिव्हर्स अवॉर्ड देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. गेली ३० वर्ष प्रिंट मीडिया आणि इलेक्ट्रॉनिक मीडिया क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिल्याबद्दल, ज्येष्ठ पत्रकार रमेश भोळे यांना पत्रकारिता क्षेत्रातील हा महत्त्वपूर्ण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाला श्री साईबाबा संस्थान शिर्डीचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, आयोजक ज्येष्ठ पत्रकार महेंद्र देशपांडे, संत अवधूत गिरी महाराज, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष पंढरीनाथ पगार आदी उपस्थित होते.



## देवीचापाडा येथे नवीन पनवेल वाहतूक शाखेतर्फे नियमांबाबत जागृती



**पनवेल : वार्ताहर**

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा देवीचापाडा येथे नवीन पनवेल वाहतूक शाखेतर्फे वाहतूक जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी विद्यार्थ्यांना विविध वाहतूक नियमांची माहिती देण्यात आली.

या वेळी पोलीस उपनिरीक्षक पांडुरंग पवार यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची सविस्तर माहिती दिली. रस्ते सुरक्षा हा पर्याय नसून ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे, असे सांगतानाच बाईक चालवताना हेल्मेटचा वापर करावा, कार चालवताना सीटबेल्टचा वापर करावा, धोकादायकरित्या वाहन चालवू नये, वाहतुकीच्या सिग्नलचे पालन करणे, वेगावर नियंत्रण ठेवने याबाबत माहिती दिली. तसेच सध्याच्या काळात घडत असलेले सायबर क्राईम बाबत सर्व विद्यार्थ्यांना माहीती देत यापासून सरंक्षण कसे करावा याबद्दल संपूर्ण माहिती दिली. या वेळी पोलीस हवालदार संतोष पाटील यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

## माजगाव केंद्रस्तरीय क्रीडा स्पर्धेत नऊ शाळांचा सहभाग



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

माजगाव केंद्राचे केंद्रप्रमुख जे.पी. परदेशी यांच्या संकल्पनेतून रसायनी पाताळगंगा परिसरातील माजगाव केंद्रात क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. स्पर्धेचे आयोजन राजिप शाळा तळवली येथे होते. शाळेचे मुख्याध्यापक मस्तान बोरगे, सहशिक्षक सुरेश मांडे सर आणि शाळा व्यवस्थापन समिती तळवली यांनी केले. कार्यक्रमाचे उद्घाटन खालापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी दीपा परब यांचा हस्ते झाले. या वेळी प्रमुख पाहुणे शिल्पा दास (वरिष्ठ विस्तार अधिकारी) आणि रविंद्र रघुवंशी (युनिट हेड बिर्ला कार्बन) हे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख जे. पी. परदेशी यांनी केले आणि कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मस्तान बोरगे सरांनी केले. या केंद्रस्तरीय स्पर्धेत ९ शाळांनी सहभाग घेतला होता. या क्रीडा स्पर्धेत लहान गट व मोठा गट असून त्यात सांघिक खेळ कबड्डी, लंगडी, आणि वैयक्तिक खेळामध्ये धावणे, लिंबू चमचा, पोते उड्या, दोरीवरच्या उड्या, बेडूक उड्या इत्यादी खेळाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमासाठी विद्यार्थी, पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. सामन्यानंतर सर्व विजेत्या मुलांना बक्षीस देऊन आभार मानून कार्यक्रमाची सांगत करण्यात आली.



## पोलीस रेझिंग डेनिमित्त नागरिकांना मार्गदर्शन

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल वाहतूक शाखे तर्फे पोलीस रेझिंग डे च्या अनुषंगाने इंडियाबुल्स सोसायटी मधील रहिवाश्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

येथील इंडिया बुल्स सोसायटी मध्ये नागरिकांना पोलीस रेझिंग डे व रस्ता सुरक्षा अभियान २०२६ च्या अनुषंगाने वाहतूकिचे नियम पाळणे बाबत प्रबोधन करण्यात आले. या वेळी पोलीस निरीक्षक प्रकाश सकपाळ, पोलीस उपनिरीक्षक शशिकांत पवार, पोलीस हवालदार संजय गावडे, जितेंद्र कदम, ज्ञानेश्वर वाघ यांनी वाहतुकीचे नियम पाळणे बाबत तसेच रस्ता सुरक्षा व वाहतूक नियमांबाबत जनजागृती करण्यात आली. या वेळी इंडियाबुल्स सोसायटीतील पदाधिकारी तसेच२०० पुरुष व महिला उपस्थित होत्या.

## प्रेमांकुर काव्यसंग्रहाचे प्रकाशन



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ येथील फुटवालाकल्चरल सेंटर (मराठा हॉल) येथे प्रसिद्ध वक्ते अरूण म्हात्रे यांच्या हस्ते कवयित्री डॉ.पुष्पांजली आ.कुंभार यांच्या पहिल्या वहिल्या प्रेमांकुर काव्यसंग्रहाचे शानदार प्रकाशन झाले.

सुनील उंब्रजकर, पुणे, यांच्या वेदांतश्री प्रकाशनाद्वारे अतिशय आकर्षक मुखपृष्ठ व प्रत्येक कवितेवर शोभेसे रेखाचित्र रेखांटन करून आकर्षक अशी छपाई करण्यात आली आहे . प्रमुख पाहुण्या कवयित्री व प्रसिद्ध निवेदिका साधना जोशी होत्या.

प्रमुख पाहुण्या साधना जोशी यांनी अतिशय अभ्यासपूर्ण असे डॉ.पुष्पांजली यांच्या कवितांचे रसग्रहणात्मक वर्णन करून श्रोत्यांची दाद मिळवली. कार्यक्रमात प्रकाशन होवू घातलेल्या 'प्रेमांकुर' काव्यसंग्रहाची पुष्पवृष्टी करून दिंडी काढली. मोठ्या प्रमाणात-सुमारे ७५ टक्के महिलावर्ग उपस्थित होता.

विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध उद्योगपती नितीन भागवत, महाराष्ट्ररस्ते विकास महामंडळाचे मुख्य अभियंत एस के सुरवसे व त्यांच्या पत्नी, सपत्नीक पोलीस अधिकारी गंगाधर देवडे, कवि विलास कुंभार, निवेदक नारायण एखतपूरकर, अशोक महाराज गोरे, सपत्नीक डॉ.राजाळे, साहित्यिका अनुसया कुंभार, बिल्डर हर्षद ठुमर व पत्नी रेखा, श्री. व सौ. भारती शिंदे, सौ. इंदू वाष्र्णेय यांनी कार्यक्रमाची शोभा वाढविली. कवयित्रीचे पती डॉ. ए.टी.कुंभार (निवृत्त आय.ए.एस.) यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## उरणमधील प्राथमिक शिक्षक संघाचा वर्धापन दिन साजरा



**उरण : वार्ताहर**

अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघ शाखा उरणच्या वतीने ७ जानेवारी १९५४ सालापासून सुरू असणाऱ्या या संघटनेच्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष उरण पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी निर्मला घरत यांनी भूषविले.

सुरुवातीला सर्व मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज. सरस्वती माता व दादासाहेब दोंदे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तदनंतर उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक उरण शाखेचे अध्यक्ष हेमंत गावंड यांनी मांडले.

प्रास्ताविकामध्ये शिक्षकांच्या विविध समस्या,अडचणी सोडवण्यासाठी ही संघटना सदैव कटिबद्ध आहे. ही संघटना फक्त महाराष्ट्रपूरती मर्यादित नाही किंवा देशापूरती मर्यादित नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर संलग्न असणारी ही संघटना आहे. सध्या शिक्षकांना भेडसावत असणारा टीईटी परीक्षेचा प्रश्न सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका मांडणारी महाराष्ट्रातील एकमेव संघटना आहे.

या वर्धापनदिनी संघटनेच्यावतीने दरवर्षी तालुक्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा, शिष्यवृत्ती धारक होणाऱ्या विद्यार्थ्यांचा व सेवानिवृत्त होणाऱ्या शिक्षकांचा गुणगौरव सोहळा संपन्न केला जातो. यावर्षी देखील तालुक्यातील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्रत्येक केंद्रातून एक अशा पाच उत्कृष्ट शिक्षिकेंचा आदर्श शिक्षिका म्हणून गौरव करण्यात आला. तसेच उरण तालुक्यातून सेवानिवृत्त झालेल्या सर्व सेवानिवृत्त बंधू-भगिनींचा देखील शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे तालुक्यातून शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांचादेखील यथोचित सन्मान करण्यात आला. तदनंतर अनेक मान्यवरांनी या संघटनेबद्दल व त्यांनी सुरू ठेवलेल्या स्तुत्य अशा उपक्रमाबद्दल गौरवोदगार काढले.

## प्रा. प्रीती ठाकूर यांना पुरस्कार प्रदान



**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील जसखार येथील प्रकल्पग्रस्त ज्येष्ठ नागरिक संस्था यांच्या २८व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित सोहळ्यात फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर उच्च माध्यमिक विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या जीवशास्त्र विषयाच्या प्राध्यापिका प्रीती सचिन ठाकूर यांना आदर्श शिक्षिका पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

या पुरस्कारप्राप्तीबद्दल स्थानिक स्कूल कमिटी चेअरमन कृष्णाजी कडू, विद्यालयाचे प्राचार्य बबन साळुंखे, उपमुख्याध्यापिका संगीता थोरात, पर्यवेक्षिका संगीता बाबर, सुप्रिया पाटील, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, दि रयत सेवक को-ऑप. बँकेचे संचालक प्रा. किशोर पाटील, विज्ञान विभागप्रमुख प्रा. झुंझार माने, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. ऋषिकेश धुरी, , कार्यालयीन प्रमुख नितीन म्हात्रे, नवनीत ठाकूर, प्रतिक वर्तक तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले.

## स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकनची बैठक



**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी रिपब्लिकन पक्ष युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांनी पनवेल महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आपल्या सर्व कार्यकर्त्यांची बैठक साईनगर येथे अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष आसिफ शेख यांच्या कार्यालयात बोलावली होती.

या वेळी त्यांनी पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीमधील भारतीय जनता पक्ष व महायुतीच्या उमेदवारांना आपण पाठिंबा दिला असून आपल्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी अतिशय जोरदारपणे काम करून महायुतीच्या सर्व उमेदवारांना निवडून देण्यासाठी प्रचारामध्ये सहभागी व्हावे विनंती केली.

या बैठकीसाठी पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# ग्रामपंचायतींच्या घरपट्टी वसुलीत लक्षणीय वाढ

## समृद्ध पंचायतराज अभियानादरम्यान तीन महिन्यात १०.७७ कोटींची वसुली

**रायगड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. त्याचा परिपाक म्हणूनच जिल्ह्यातील ग्रामपंचायतींच्या घरपट्टी वसुलीत या अभियानादरम्यान लक्षणीय वाढ झाली आहे. ऑगस्ट ते डिसेंबर २०२५ या तीन महिन्यांच्या कालावधीत ग्रामपंचायतींची तब्बल ९० कोटी ७७ लाखांची वसुली आहे. या वसुलीमुळे ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होणार आहे.



जिल्ह्यात शासनाच्या समृद्ध पंचायतराज अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची घरपट्टीची मोठी थकबाकी राहिल्याने या अभियानांतर्गत थकबाकी भरणासाठी ग्रामपंचायतींतर्फे विशेष कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामपंचायतींना सोमवारी व शनिवारी असे दोन दिवस घरपट्टी भरणासाठी कॅम्प आयोजित करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे अभियानाच्या कालावधीत घरपट्टीवर ५० टक्के सुट शासनातर्फे देण्यात आली. या सवलतीचा लोभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेउन अत्यंत सकारात्मक प्रतिसाद दिला.

अभियान कालावधीतच १३ डिसेंबर रोजी आयोजित लोकअदालतीमुळे अनेक प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्यात आला. या लोकअदालतीमध्ये जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून घरपट्टीची एकूण २७ हजार ३४१ प्रकरणे ठेवण्यात आली. यातील आठ हजार ३१६ प्रकरणांचा निपणारा करून सहा कोटी ८०-८० लाख १४ हजार ९६३ रुपयांची घरपट्टी वसूल होण्यास मदत झाली.

रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामपंचायतींना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्यावर विशेष भर दिला जात आहे. वाढीव घरपट्टी वसुलीमुळे ग्रामपंचायतींना मूलभूत सुविधा, विकासकामे व लोकहिताच्या योजना अधिक प्रभावीपणे राबविता येणार आहे.

**यामुळे घरपट्टी वसुलीत वाढ**

*✻ समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत घरपट्टी वसुलीसाठी सोमवार व शनिवारी विशेष कॅम्पचे आयोजन*

*✻ घरपट्टी करावर ५० टक्के सवलत*

*✻ लोकअदालतीत ठेवलेल्या प्रकरणांचा तातडीने निपटारा*

*✻ जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतींकडून ऑनलाईन पेमेंटची सुविधा*

**पाणीपट्टी वसुलीही वाढली**

*पाणीपट्टी वसुलीतही एप्रिल ते डिसेंबर २०२५दरम्यान ५०.५६ टक्के वसुली झाली असून समृद्ध पंचायतराज अभियानादरम्यान सुमारे नऊ कोटींची वाढ झाली आहे. त्याचप्रमाणे लोकअदालतीमध्ये पाणीपट्टीची सहा हजार ६८९ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यातील एक हजार ४७४ प्रकरणांचा निपटारा झाला असून एक कोटी १४ लाख ४१ हजार ५५० रुपयांची वसुली झाली आहे.*

**जिल्ह्यातील ग्रामपंचायतींकडून एप्रिल ते डिसेंबर २०२५ या कालावधीत तब्बल ६२ टक्के घरपट्टी वसुली करण्यात आली आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानामुळे घरपट्टी वसुलीला गती मिळाली आहे. हे अर्थिक वर्ष संपेपर्यंत म्हणजे पुढील तीन महिन्यात ही वसुली ९० टक्क्यांपर्यंत करण्याचा आमचा मानस आहे. त्याप्रमाणे ग्रामपंचायतींनाही सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रामस्थांनीही ग्रामपंचायतींना घरपट्टी भरून सहकार्य करावे.**

**-नेहा भोसले,**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**रायगड जिल्हा परिषद**

# वीर यशवंतराव घाडगेंचा पराक्रम अमर : कर्नल मोरे

**माणगाव : प्रतिनिधी**



ज्या मातीतून जन्म घेऊन एका तरुणाने हसत-हसत मृत्यूला कवटाळले, ज्या छातीवर राष्ट्रध्वजाचा अभिमान घेऊन तो रणांगणात झुंजला त्या वीर यशवंतराव घाडगे यांचे शौर्य आजही प्रत्येक भारतीयाच्या रक्तात स्फुल्लिंग चेतवणारे आहे. मरणोत्तर व्हिक्टोरिया क्रॉस या सर्वोच्च शौर्यपदकाने सन्मानित झालेल्या या अमर वीराचा पराक्रम आजच्या पिढीसाठी दीपस्तंभ आहे, असे भावूक उदगार कर्नल किशोर मोरे यांनी माणगाव येथे आयोजित जयंती कार्यक्रमात काढले.

या कार्यक्रमास तहसीलदार विपीन लोकरे, पोलीस निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे, माजी सैनिक संघटना माणगाव-तळा तालुका अध्यक्ष सुरेश गायकवाड यांच्यासह पदाधिकारी व सभासद, महसूल व पोलीस खात्याचे अधिकारी, कर्मचारी, नागरिक, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वीर यशवंतराव घाडगे यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आले.

ज्यांच्या पराक्रमाची दखल परदेशाने घेतली, ज्यांचे स्मारक परदेशी भूमीवर सन्मानाने उभे आहे त्या वीराच्या स्मृतीकडे स्वतःच्या देशात मात्र दुर्लक्ष होत असल्याची वेदना अनेकांच्या डोळ्यातून दिसत होती. दरम्यान, मंत्री आदिती तटकरे यांच्या पुढाकारातून स्मारक परिसरात सभामंडप उभारून थोडेसे सुशोभीकरण करण्यात आले, हे दिलासादायक असले तरी अपुरे आहे. ज्या वीराने देशासाठी सर्वस्व अर्पण केले, त्याच्या स्मृतीसाठी आपल्याकडे वेळ, निधी आणि संवेदना नाहीत का? असा सवाल या जयंतीदिनी पुन्हा एकदा उपस्थित झाला.

# नागोठण्यातील शिबिरात ७२ रुग्णांची नेत्र तपासणी

## मोतीबिंदू आढळलेल्या २३ रुग्णांवर होणार शस्त्रक्रिया

**नागोठणे : प्रतिनिधी**

नागोठणे लायन्स क्लबचे माजी अध्यक्ष पांडुरंग उर्फ पी.के. शिंदे यांनी आपले वडील हभप वै. कृष्णा पां. शिंदे व आई हभप वै. द्रौपदी कृष्णा शिंदे यांच्या स्मरणार्थ आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या सहकार्याने स्व. बाळासाहेब ठाकरे बाल उद्यानात नेत्रचिकित्सा शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात ७२ नागरिकांनी त्यांच्या डोळ्यांची तपासणी करून घेत उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यामध्ये मोतिबिंदू आढळलेल्या २१ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी शंकरा आय हॉस्पिटल येथे पाठविण्यात आले.



या शिबिरात नागोठणे लायन्स क्लबचे अध्यक्ष सखाराम ताडकर, चार्टड प्रेसिडेंट प्रकाश (घिसूशेठ) जैन, शिक्षण विभागाचे डिस्ट्रिक्ट चेअरमन यशवंत चित्रे, झोनल चेअरमन एमजेएफ विवेक सुभेकर, सेक्रेटरी डॉ. अनिल गीते, उपाध्यक्ष विशाल शिंदे, माजी सरपंच विलास चौलकर, दौलत मोदी, पांडुरंग शिंदे, विजय शहासने, संतोष शहासने, दीपक गायकवाड, सिद्धेश काळे, पूजा पांडुरंग शिंदे, आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलच्या समुपदेशक ज्योती पाटील, नेत्रचिकित्सक स्वप्ना राणे, अर्पिता जाधव आदींसह नागरिक उपस्थित होते.

या वेळी यशवंत चित्रे यांनी मनोगतात पांडुरंग शिंदे यांच्या सामाजिक कार्याची माहिती दिली आणि त्यांनी आपल्या आई- वडिलांच्या स्मरणार्थ नेत्रचिकित्सा शिबिर आयोजित करण्याचे मोलाचे सामाजिक कार्य केल्याचे सांगितले. डॉ. अनिल गीते यांनी मोतीबिंदू शास्त्रक्रियेनंतरची डोळ्यांची निगा व काळजी याविषयी माहिती दिली.

या शिबिराच्या निमित्ताने स्व. बाळासाहेब ठाकरे बाल उद्यानातील नव्याने तयार करण्यात आलेल्या सिमेंट पत्र्याच्या शेडचा मजुरीचा खर्च लायन्स क्लबचे अध्यक्ष सखाराम ताडकर यांनी स्वतः केल्याने विलास चौलकर यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

# खालापुरात कारच्या धडकेत पित्रा-पुत्र जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

दुचाकीवरून जाणारे भास्कर किसन इंदोरे (वय ४५) आणि त्यांचा मुलगा ओमकार (वय २२, रा. पनवेल) यांना भरधाव कारने धडक दिल्याने झालेल्या अपघातात भास्कर हे गंभीर जखमी झाले आहेत. ओमकारदेखील जखमी झाला आहे.

ओमकार हा मंगळवारी सकाळी दुचाकी घेऊन पनवेलच्या दिशेने निघाला होता. पाठीमागे त्याचे वडील भास्कर बसले होते. ११ वाजण्याच्या सुमारास खालापूर हद्दीत आसरेवाडी येथे आले असताना गावाकडून येणाऱ्या कारच्या चालकाने त्याचे ताब्यातील वाहन कोणताही इशारा न देता निष्काळजीपणे मुंबई लेनवर कार चालवित आणत दुचाकीला जोरदार धडक दिली.

अपघातात भास्कर आणि ओमकार दोघेही जखमी झाले असून भास्कर यांना जास्त प्रमाणात मार लागला. त्यांची प्रकृती गंभीर आहे. अपघातास कारणीभूत कारचालक अपघाताची खबर न देता अपघात ठिकाणावरून पळून गेला. याबाबत खालापूर पोलीस ठाणे येते ओमकार यांनी अज्ञात कारचालकाविरोधात तक्रार दिली असून त्याप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास हवालदार आबा गेंड करीत आहेत.

# ॲड. मनस्वी मोहिते यांच्या प्रयत्नातून साळाव येथे विविध कामांचे भूमिपूजन



**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील साळाव येथे विविध कामांचे भूमिपूजन कार्यक्रम नुकताच झाला. भाजप महिला मोर्चा दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष ॲड. मनस्वी मोहिते यांच्याकडे साळाव ग्रामस्थांनी राजिप शाळा दुरूस्ती व गावातील अंतर्गत रस्ता नुतनीकरणाची मागणी केली होती. त्यानुसार ॲड. मोहिते यांच्या प्रयत्नातून शाळा दुरूस्तीसाठी सात लाख रुपये आणि अंतर्गत रस्ता नूतनीकरणासाठी पाच लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला.

शाळा दुरूस्ती व अंतर्गत रस्ता नूतनीकरण कामाच्या भूमिपूजन समारंभास भाजप दक्षिण रायगड जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते, ॲड. मनस्वी मोहिते, साळाव ग्रामपंचायतीचे उपसरपंच दिनेश बापळेकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे सय्यद खान तसेच साळाव व पंचक्रोशीतील पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

प्रारंभी साळाव गावातील अंतर्गत रस्ता नूतनीकरणाचे भूमिपूजन ॲड. मनस्वी मोहिते व अन्य उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर राजिप शाळा दुरूस्ती कामाचे भूमिपूजन श्रीफळ वाढवून करण्यात आले.

या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना ॲड. मोहिते यांनी साळाव व पंचक्रोशीत विविध विकासकामे राबविण्यास सुरुवात झाली आहे. यापुढेही अनेक कामे करण्याचा मनोदय त्यांनी व्यक्त केला.

# वडगाव कोंड येथे पशुवैद्यकीय शिबिर

**माणगाव : बातमीदार**

माणगाव तालुक्यातील वडगाव कोंड येथे रोटरी क्लब गोरेगावच्या वतीने मूक पशूंच्या आरोग्यासाठी मोफत पशुवैद्यकीय शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. बोलू न शकणाऱ्या मूक प्राण्यांच्या वेदना समजून घेत त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याच्या संवेदनशील भावनेतून हा उपक्रम राबविण्यात आला.

या शिबिरामध्ये गावातील व परिसरातील सुमारे १०० मूक पशूंची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले. आजारी व अशक्त पशूंना आवश्यक ती औषधे पूर्णतः मोफत देण्यात आली. त्यामुळे पशुपालकांमध्ये समाधानाचे वातावरण पहायला मिळाले. शिबिरादरम्यान उपस्थित डॉ. कुलकर्णी यांनी पशुपालकांना अत्यंत मोलाचे मार्गदर्शन केले. पशुसंवर्धनासाठी उपलब्ध असलेल्या विविध शासकीय योजनांची माहिती, त्या योजनांमधून होणारे लाभ तसेच त्या योजना कशा प्रकारे मिळवाव्यात याबाबत सविस्तर व सोप्या शब्दांत माहिती दिली. यामुळे पशुपालकांना भविष्यातील संधींबाबत दृष्टीकोन मिळाला.

या उपक्रमाची आणखी एक महत्त्वाची बाब म्हणजे प्रत्येक शेतकऱ्याला पाच किलोपर्यंत मका मोफत देण्याची घोषणा करण्यात आली. या घोषणेला पशुपालकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि अनेकांनी या सुविधेचा लाभ घेतला.

या शिबिरास रोटरी क्लबचे डॉ. मंदार मेहता, अध्यक्ष महावीर जैन, सचिव प्रितम गांधी, अमोल कुलकर्णी, रघुनाथ गावडे, जगदीश भोकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्व पदाधिकाऱ्यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. मूक पशूंच्या आरोग्याची काळजी घेणे म्हणजेमानवी संवेदनशीलतेचा खरा अर्थ, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. माणसांसाठी आरोग्य शिबिरे नेहमीच होतात; मात्र शेती फुलवणारे, दूध-दुभते देणारे आणि निस्वार्थ प्रेम करणारे मूक प्राणी यांच्याही आरोग्याची काळजी घेणे हे समाजाचे कर्तव्य आहे, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

जे बोलू शकत नाहीत, पण खूप काही देतात या भावनेतून रोटरी क्लब गोरेगाव समाजाप्रती आपली बांधिलकी सातत्याने जपत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले. प्राणी बोलू शकत नाहीत, मात्र त्यांच्या डोळ्यांतील समाधान या शिबिराच्या यशाची साक्ष देत होते.या उपक्रमात सहभागी झालेले सर्व डॉक्टर, रोटरी सदस्य, स्वयंसेवक आणि पशुपालकांचे आयोजकांच्या वतीने आभार मानण्यात आले.




# शिक्षक वर्धापन दिनी खालापुरात कार्यक्रम

**खोपोली : प्रतिनिधी**

विद्याज्ञानाचे काम करतानाच शासकीय कामाच्या बोजा पेलताना स्वतःसाठी जगणं विसरलेल्या प्राथमिक शाळेतील गुरुजींनी शिक्षकांची वारी या संकल्पनेतून विविध कार्यक्रम आयोजन करत धमाल लुटली. खालापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांतील शिक्षक, शिक्षिकांनी तसेच पंचायत समिती कर्मचारी यांनी क्रिकेट, होम मिनिस्टर, संगीत खुर्ची अशा विविध उपक्रमात भाग घेतला.

क्रिकेट स्पर्धेत अंतिम सामन्यात आत्करगाव संघाने शेवटच्या चेंडूपर्यंत लढत विजेतेपद पटकावले. वावर्ले शिक्षक संघाने उपविजेतेपद पटकावले. वावर्ले संघातील मधू पारधी उत्कृष्ट फलंदाज, सावरोली संघाचा दादासाहेब मुंजाळ उत्कृष्ट गोलंदाज, तर आत्करगाव संघाचा योगेश बिरादार स्पर्धेचा मानकरी ठरला.



पैठणी स्पर्धेत अनिता चव्हाण केंद्र जांबरुंग विजेती, तर उपविजेती तृप्ती ताठरे केंद्र मोहपाडा ठरल्या. संगीत खुर्चीत प्रथम क्रमांक कांचन कडू केंद्र चौक, द्वितीय क्रमांक सुगीता गवळी केंद्र जाबंरूग, तृतीय क्रमांक जयश्री सुर्वे केंद्र खालापूर यांनी पारितोषिक पटकाविले.

तालुक्यातील सुमारे २५० शिक्षक यामध्ये सहभागी झाले होते. या वेळी सेवानिवृत्त शिक्षक तसेच तालुक्यातून राज्यस्तरावर निवड झालेल्या शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन संघटनेचे सरचिटणीस धनाजी थिटे, क्रिकेट सामन्यांचे समलोचन आबा कदम व अनिल देशमुख, तर राजेश बाविस्कर यांनी गुणलेखकाची भूमिका पार पाडली.

वरिष्ठ विस्ताराधिकारी शिल्पा दास-पवार, दिलीप देशमुख, उमेश विचारे, दीपक पालकर, संतोष पाटील, हेमंत म्हात्रे, जयंत पाटील, किशोर परदेशी, नंदा मोहिते, गजानन गोरे, राजन पाटील, विविध केंद्र प्रतिनिधी, प्रसिद्धी प्रमुख आदी मान्यवर उपस्थित होते.

# मोरे फाऊंडेशनच्या स्कूलमध्ये जॉयफेस्ट

**रोहा : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे फाऊंडेशनच्या इंग्लिश मीडियम स्कूल, रोहा येथे जॉयफेस्ट २०२६ या आनंदोत्सवाचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले. या मेळाव्यास विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन नगराध्यक्ष वनश्री शेडगे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास एम.बी. मोरे फाऊंडेशन संस्थापक विजय मोरे, अशोक मोरे, निधी गर्ग, धाटावच्या माजी सरपंच श्रीमती सुवर्णा रटाटे आदी उपस्थित होते. उद्घाटनानंतर विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी परिश्रमपूर्वक उभारलेल्या विविध स्टॉल्सना मान्यवरांनी भेट दिली. या स्टॉल्समध्ये खेळ, खाद्यपदार्थ, शैक्षणिक उपक्रमांसह मॅजिक शो व हॉन्टेड हाऊस या विशेष आकर्षणांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. हा जॉयफेस्ट आनंद, शिक्षण व मनोरंजनाचा सुंदर संगम ठरला.

# खालापुरात एकाच दिवशी साकारले ३८ वनराई बंधारे

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समितीच्या माध्यमातून तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या हद्दीत नाले, ओढे व लहान नद्यांमध्ये पाणी अडवण्यासाठी एकाच दिवशी तब्बल ३८ वनराई बंधाऱ्यांची उभारणी करण्यात आली. हा उपक्रम मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत श्रमदानाच्या माध्यमातून यशस्वीपणे पार पडला.



या अभियानांतर्गत तालुक्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीत गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या मार्गदर्शनाखाली जलसंधारणाची कामे हाती घेण्यात आली आहेत. ग्रामपंचायत हद्दीतील सखल भाग, जंगल भाग व दुर्गम परिसरात असलेल्या नाले व ओढ्यांवर वनराई बंधारे उभारून पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी अडवण्याचा उद्देश या उपक्रमामागे आहे. ग्रुप ग्रामपंचायत चौक, लोधीवली, टेंभरी, तांबाटी, शिरवली, साजगावसह तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतींनी कर्मचारी, ग्रामस्थ, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते यांच्या माध्यमातून या बंधाऱ्यांची बांधणी करण्यात आली.

अतिदुर्गम भागातदेखील वनराई बंधाऱ्यांची उभारणी करण्यात आली. अभियानांतर्गत श्रमदानातून बांधण्यात आलेल्या जलसंधारण बंधाऱ्याची पाहणी करण्यात आली.

### भारत वि. न्यूझीलंड आज पहिली वनडे रंगणार

# रोहित, विराटच्या कामगिरीकडे लक्ष

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ घरच्या मैदानावर न्यूझीलंडविरुद्ध तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका खेळणार आहे. या मालिकेतील पहिला वनडे सामना रविवारी (दि.११) वडोदरा येथे होणार आहे. क्रिकेट चाहत्यांसाठी ही पर्वणी असणार आहे, कारण रोहित शर्मा, विराट कोहली हे अनुभवी खेळाडू पुन्हा एकदा मैदानात दिसणार आहेत. या मालिकेनंतर दोन्ही संघांमध्ये टी-२० सामनेही खेळले जाणार आहेत.

न्यूझीलंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे मालिकेत रोहित शर्मा आणि विराट कोहली यांच्याकडे सर्वांचे लक्ष असेल. दोघेही सध्या जबरदस्त फॉर्ममध्ये आहेत. देशांतर्गत क्रिकेटमध्ये त्यांचा जलवा पहायला मिळाला. विराटने मागील सहा डावांत तीन शतके आणि तीन अर्धशतके झळकावली आहेत. रोहितच्या भात्यातूनही धमाकेदार खेळी पहायला मिळाली. त्यामुळे ही जोडी नव्या वर्षाची सुरुवातही धमाक्यात करेल, अशी अपेक्षा आहे.

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील अलीकडच्या वनडे सामन्यांमध्ये भारताचे पारडे जड राहिले आहे. मागील पाच वनडे सामन्यांत भारताने सर्व सामने जिंकले असून यामुळे टीम इंडियाचा आत्मविश्वास



निश्चितच वाढलेला आहे.

भारत आणि न्यूझीलंड वनडे मालिकेतील पहिला सामना ११ जानेवारीला वडोदरामध्ये, दुसरा वनडे सामना बुधवारी १४ जानेवारीला सौराष्ट्र क्रिकेट स्टेडियममध्ये, तर तिसरा सामना १८ जानेवारीला होळकर स्टेडियम इंदोरमध्ये खेळवला जाणार आहे. या वनडे मालिकेनंतर दोन्ही संघांमध्ये पाच सामन्यांची टी-२० मालिका २१ ते ३१ जानेवारीदरम्यान खेळवली जाईल. आगामी टी-२० विश्वचषकाच्या दृष्टीने ही वनडे मालिका दोन्ही संघांच्या सरावासाठी महत्त्वाची असणार आहे.

भारत आणि न्यूझीलंड वनडे मालिकेतील सामने दुपारी १.३० वाजता सुरू होतील, तर नाणेफेक अर्धा तास आधी १ वाजता होईल. मालिकेतील सर्व सामने स्टार स्पोर्ट्स १ या चॅनेलवर लाईव्ह पाहता येणार आहेत, तर जिओ हॉटस्टार ॲपवर सामन्याचे लाईव्ह स्ट्रीमिंग पाहता येईल.

# आरसीबीचा थरारक विजय

### डब्ल्यूपीएलमध्ये डी क्लार्कची झुंजार खेळी; मुंबईचा पराभव

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महिला प्रीमियर लीगच्या (डब्ल्यूपीएल) सलामीच्या सामन्यात क्रिकेट चाहत्यांना एका ऐतिहासिक थराराचा अनुभव आला. एका क्षणी मुंबई इंडियन्सच्या खिशात असलेला सामना नादिन डी क्लार्कने आपल्या अचाट फलंदाजीच्या जोरावर हिसकावून आणला. शेवटच्या षटकात आरसीबीला विजयासाठी मोठ्या धावांची गरज असताना डी क्लार्कने अशक्य वाटणारा विजय शक्य करून दाखवला.

मुंबईची अनुभवी गोलंदाज नॅट सायव्हर-ब्रंट शेवटचे षटक टाकत होती. पहिल्या दोन चेंडूंत एकही धाव न आल्याने आरसीबीच्या आशा मावळल्या होत्या, पण त्यानंतर जे घडले ते अविश्वसनीय होते

शेवटच्या षटकापर्यंत सामना मुंबई इंडियन्सच्या हातात होता. मैदानात दव असल्याने चेंडू ओला झाला होता. कर्णधार हरमनप्रीत कौर चेंडू पुसून रणनीती आखत होती, पण डी क्लार्कच्या आत्मविश्वासापुढे मुंबईची सर्व गणिते फेल ठरली. डी क्लार्कने याआधी विश्वचषकात भारताविरुद्ध



अशीच खेळी केली होती, त्याचीच पुनरावृत्ती आरसीबीसाठी केली. तिने चौकार षटकारांचा पाऊस पाडला आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाला विजय मिळवून दिला. त्यामुळे मुंबईची विजयी सलामी देण्याची संधी थोडक्यात हुकली.

विजयी चौकार मारताच आरसीबीच्या खेळाडूंनी मैदानात धाव घेत नादिन डी क्लार्कला मिठी मारली. ४०/० वरून ६३/५ अशी अवस्था झालेल्या आरसीबीने हा सामना जिंकून 'कमबॅक' कसे करावे याचा नवा वस्तुपाठ घालून दिला आहे. डब्ल्यूपीएलच्या इतिहासात पाठलाग करताना शेवटच्या चेंडूवर विजय मिळवण्याची ही केवळ तिसरी वेळ आहे.

## खेलो इंडिया बीच गेममध्ये अनुज सरनाईकला रौप्यपदक

**पाली : प्रतिनिधी**

दिव येथील घोगला बीचवर सुरू असलेल्या खेलो इंडिया बीच गेम



स्पर्धेत पिंच्याक सिल्याट या क्रीडा प्रकारामध्ये रायगडच्या पाली येथील अनुज सरनाईक, अंशुल कांबळे आणि मुकेश चौधरी या पुरुष संघाने रौप्यपदक पटकावले.

या खेळाडूंना स्पोर्ट ऑफ इंडियाच्या डेप्युटी डायरेक्टर भाविनी मॅडम यांच्या हस्ते मेडल प्रदान करण्यात आले. या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य क्रीडा व युवा सेवा संचालनालयाचे अप्पर संचालक नवनाथ फडतरे, इंडियन पिच्याक फेडरेशनचे अध्यक्ष किशोर येवले, सीईओ मोहम्मद इक्बाल, महाराष्ट्र संघाच्या क्रीडा अधिकारी व व्यवस्थापक नेहा साप्ते यांनी सर्व पदकविजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले.

## राष्ट्रीय तायक्वॉन्डो स्पर्धेसाठी रायगडच्या रेफरी, खेळाडूंची निवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिल्ली येथे होणाऱ्या सब ज्युनियर राष्ट्रीय तायक्वॉन्डो स्पर्धेसाठी रायगड जिल्ह्यातील दोन रेफरी आणि दोन खेळाडूंची निवड झाली आहे.

तायक्वॉन्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या वतीने कणकवली येथे आयोजित राज्यस्तरीय स्पर्धेत रायगडचे खेळाडू मनस्वी आंधळे व महीरा अफसर यांनी आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून सुवर्णपदक पटकावले. या दोन खेळाडूंसह रेफरी म्हणून आंतरराष्ट्रीय पंच प्राजक्ता अंकोलेकर व राष्ट्रीय पंच प्रशांत घरत राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. ही स्पर्धा १३ ते १५ जानेवारीदरम्यान दिल्ली येथील तालकतोरा इंनडोर स्टेडियममध्ये होणार आहे.

मनस्वी व महीरा या दोघींना



रायगडचे प्रमुख प्रशिक्षक सुभाष पाटील व सहाय्यक प्रशिक्षक तेजस माळी यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. या खेळाडूंना तायक्वॉन्डो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र आणि रायगड तायक्वॉन्डो असोसिएशनचे सर्व पदाधिकारी व इतर मान्यवरांनी राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

## नेरे येथील किशन खारके बनला 'रिनॉन्ड शूटर'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिल्लीतील डॉ. कर्णिसिंग शूटिंग रेंज येथे झालेल्या ६८व्या राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धेत सिद्धांत रायफल क्लबचा नेमबाज किशन खारके (रा. नेरे, पनवेल) याने ५३५ गुण संपादन करून सेंटर फायर पिस्तूलमध्ये विख्यात नेमबाज (रिनॉन्ड शूटर) होण्याची पदवी संपादन केली.

या स्पर्धेत क्लबचे नेमबाज जयंत साळवे (मुंबई) याने २५ मीटर सेटर फायर पिस्तूलमध्ये विख्यात नेमबाज होण्याची पदवी संपादन केली तसेच १० मीटर पिस्तूल शूटिंगमध्ये सुप्रिता सुबुद्धी ५५८ गुण संपादन केल्याने भारतीय ट्रायलसाठी निवड झाली. हे सर्व सिद्धांत रायफल क्लबच्या इंडियन मॉडेल स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज येथे अलंकार कोळी, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक जयंत साळवे यांच्याकडे प्रशिक्षण घेत असून नवोदितांना देत आहेत.

या यशाबद्दल क्लबचे अध्यक्ष विजय खारकर, प्रितम पाटील, महेश फुलोरे,




समाधान घोपरकर, अजिंक्य चौधरी, किरण माळी, अविनाश भगत, सुरज थळे, सागर भोईर, किरण मोहिते, निलेश भगत, प्रकाश दिसले, हेमंत भगत, संदेश पाटील, जगदीश पाटील, शैलेश पाटील, जयदास पाटील, अर्जुन पाटील, संतोष फडके, जितेश पाटील, राजू मुंबईकर समीर आंबवणे, नंदकुमार मुंबईकर तसेच क्लबचे सदस्य व मित्र परिवार व नेरे ग्रामस्थ यांनी अभिनंदन करूण पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## विराट कोहलीला खुणावतोय आणखी एक माईलस्टोन

**बडोदा : वृत्तसंस्था**

भारताचा दिग्गज फलंदाज विराट कोहली आता केवळ वनडे क्रिकेट खेळत असून यामुळे त्याच्या एकेक लढतीबद्दल कमालीची उत्सुकता असते. आता हा दिग्गज आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २८ हजार धावांचा माईलस्टोन सर करण्याच्या उंबरठ्यावर आहे. आणखी २५ धावा जमवल्यानंतर तो या मांदियाळीत दाखल होईल.

न्यूझीलंडविरुद्ध वनडे क्रिकेटमध्ये विराटने ३३ डावांत ५५.२३च्या सरासरीने १,६५७ धावा केल्या आहेत. यात सहा शतके, नऊ अर्धशतके आणि नाबाद १५४ ही सर्वोत्तम धावसंख्या आहे. तो २८ हजार आंतरराष्ट्रीय धावा पूर्ण करण्यापासून केवळ २५ धावा दूर आहे. सध्या ५५६ सामन्यांतील ६२३ डावांत ८४



शतके आणि १४५ अर्धशतकांसह ५२.५८च्या सरासरीने २७,९७५ धावा त्याच्या नावावर आहेत. नाबाद २५४ ही त्याची सर्वोत्तम धावसंख्या आहे. लवकरच तो भारतीय आयकॉन सचिन तेंडुलकर आणि कुमार संगकारा यांच्या पंक्तीत दाखल होण्याची शक्यता आहे.

आता केवळ वनडे क्रिकेटवर लक्ष केंद्रित करणाऱ्या विराटने डिसेंबरमध्ये दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मालिकेत तीन सामन्यांत १५१.००च्या सरासरीने ३०२ धावा काढत प्लेअर ऑफ द सीरिजचा पुरस्कार पटकावला होता. यामध्ये त्याने दोन शतके आणि एक अर्धशतक झळकावले होते. त्यानंतर डिसेंबरच्या अखेरीस विराटने १५ वर्षांनंतर विजय हजारे करंडक स्पर्धेत दिल्लीचे प्रतिनिधित्व केले. आंध्र प्रदेशविरुद्ध १३१ आणि गुजरातविरुद्ध ७७ धावा काढताना तो नेहमीप्रमाणेच प्रभावी दिसला होता.

### सचिनला मागे टाकण्याचीही संधी

किंग कोहलीच्या निशाण्यावर मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा आणखी एक विक्रम मोडण्याची संधी असेल. भारत-न्यूझीलंड वनडे सामन्यांत सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम हा महान क्रिकेटपटू सचिनच्या नावावर आहे. सचिनने आपल्या कारकिर्दीत न्यूझीलंडविरुद्ध ४२ वनडे सामन्यांत १७५० धावा केल्या आहेत. यात त्याच्या खात्यात पाच शतके आणि आठ अर्धशतकांची नोंद आहे. त्याचा हा विक्रम मागे टाकण्याची विराट कोहलीला संधी आहे. विराट कोहली हा सध्या कमालीच्या फॉर्ममध्ये आहे. आतापर्यंत त्याने न्यूझीलंडविरुद्धच्या वनडेत ३१ सामन्यांत सहा शतकाच्या मदतीने १६५७ धावा केल्या आहेत. सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडीत काढण्यासाठी त्याला फक्त ९४ धावांची गरज आहे. एका मोठ्या खेळीसह तो न्यूझीलंडविरुद्धच्या वनडेत सर्वाधिक धावा करणारा भारतीय ठरू शकतो.

## लिव्हरपूलने अर्सेनलला गोलशून्य बरोबरीत रोखले

**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लिश प्रीमियर लीग गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या अर्सेनलची आपली आघाडी अधिक मजबूत करण्याची सुवर्णसंधी हुकली. एमिरेटस् स्टेडियमवर रंगलेल्या चुरशीच्या लढतीत चौथ्या स्थानावरील लिव्हरपूलने अर्सेनलला गोलशून्य बरोबरीत रोखले.

या बरोबरीनंतरही अर्सेनल ४९ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थानी कायम आहे. मँचेस्टर सिटी आणि स्टॉन व्हिला अनुक्रमे ४३ गुणांसह दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावर असून लिव्हरपूल ३५ गुणांसह चौथ्या स्थानावर आहे. तत्पूर्वी, मँचेस्टर सिटीने ब्राईटनसोबत बरोबरी पत्करल्यामुळे अर्सेनलला आठ गुणांची आघाडी घेण्याची संधी होती, मात्र विद्यमान विजेत्यांविरुद्ध त्यांना गोल नोंदवण्यात अपयश आले.

संपूर्ण सामन्यात दोन्ही संघांना गोल करण्याच्या स्पष्ट संधी निर्माण

**इंग्लिश प्रीमियर लीग**



करण्यासाठी संघर्ष करावा लागला. लिव्हरपूलचा गोलरक्षक लिसन बेकरची अर्सेनलच्या स्ट्रायकर्सनी फारशी परीक्षा घेतली नाही. दुसरीकडे दुखापतग्रस्त ह्युगो एकिटिकेच्या अनुपस्थितीत लिव्हरपूलची आक्रमक फळीही निस्तेज भासली. लिव्हरपूलच्या कॉनर ब्रॅडलीचा एक प्रयत्न गोलपोस्टच्या क्रॉसबारला धडकून परतला. नंतर त्यालाही गुडघ्याच्या दुखापतीमुळे मैदानाबाहेर जावे लागले.

या लढतीच्या दुसऱ्या सत्रात लिआंड्रो ट्रॉसार्डचा पास मार्टिन झुबिमेंडीने उत्कृष्टरीत्या अडवत अर्सेनलची चाल उधळून लावली. लिव्हरपूलच्या डॉमिनिक सोबोस्लाईचा फ्री-किकवरील प्रयत्नही गोलपोस्टच्या वरून गेल्याने सामन्यातील कोंडी कायम राहिली. गॅब्रिएल मार्टिनेलीने अखेरच्या मिनिटांत प्रयत्न केले, मात्र अर्सेनलला विजय मिळवून देण्यात तो अपयशी ठरला. या बरोबरीमुळे अर्सेनलची घरच्या मैदानावरील सलग सात विजयांची मालिका खंडित झाली आहे.

अर्सेनलचा पुढील सामना १७ जानेवारी रोजी नॉटिंगहॅम फॉरेस्टविरुद्ध होणार आहे. त्याआधी गनर्स संघ एफए कपमध्ये पोर्टस्माऊथ आणि ईएफएल कपमध्ये चेल्सीशी भिडेल.

## गिल म्हणतो, नशिबात लिहिले असेल ते मिळेल!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा वनडे कर्णधार शुबमन गिल एकेकाळी टी-२० संघाचा उपकर्णधार होता. सूर्यकुमार यादवनंतर आता गिल टी-२० संघासह तीनही फॉरमॅटचा कर्णधार होणार अशी चर्चा सुरू होती, मात्र भारतात अवघ्या काही महिन्यात सुरू होणाऱ्या टी- २० वर्ल्डकपचा भारतीय संघ जाहीर झाला अन् गिलसह सर्वांनाच एक मोठा धक्का बसला.

१५ सदस्यांच्या संघात उपकर्णधार शुबमन गिललाच डच्चू देण्यात आला होता. उपकर्णधारपदावरून गिलला थेट संघाबाहेरचा रस्ता दाखवण्यात आला. संघ जाहीर झाला त्यावेळी गिल काही बोलला नव्हता, मात्र



आता न्यूझीलंडविरूद्धच्या वनडे मालिकेपूर्वी कर्णधार म्हणून प्रेस कॉन्फरन्सला सामोरे गेल्यावर त्याला याबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्या वेळी त्याने टी-२० संघातून वगळ्याबद्दल त्याची काय भावना अन् मत आहे याबाबत वक्तव्य केले.

गिल म्हणाला, सर्वात पहिल्यांदा मी माझ्या आयुष्यात जिथे असायला हवा होतो तिथे आहे. जे काही माझ्या नशिबात लिहिले असेल ते मला मिळेल. एक खेळाडू म्हणून मला संघाला विजय मिळवून द्यायचा आहे.

गिलने निवड समितीबाबतही आपले मत मांडले. त्याने कोणतेही वादग्रस्त वक्तव्य न करत निवडसमितीचा निर्णय मान्य केला. तो म्हणाला, मी निवड समितीच्या निर्णयाचा पूर्णपणे आदर करतो. टी-२० संघाला शुभेच्छा देतो. मला आशा आहे ते वर्ल्डकप जिंकतील.

## भावनिक निर्णय नको, भविष्याचा विचार करा!

### माजी कर्णधार तमिमचा बांगलादेश क्रिकेट मंडळाला सल्ला

**ढाका : वृत्तसंस्था**

आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेसाठी बांगलादेश संघाला भारतात पाठवायचे की नाही याबाबतचा निर्णय घेताना केवळ लोकांच्या भावनांचा विचार करणे योग्य ठरणार नाही. त्याचे परिणाम पुढील १० वर्षांपर्यंत भोगावे लागू शकतील. त्यामुळे कोणताही भावनिक निर्णय घेणे टाळा, असा सल्ला माजी कर्णधार तमिम इक्बालने बांगलादेश क्रिकेट मंडळाला (बीसीबी) दिला आहे.

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) सूचनेनंतर आयपीएल संघ कोलकाता नाइट रायडर्सने बांगलादेशचा वेगवान गोलंदाज मुस्तफिझूर रहमानला संघमुक्त केले. बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचार वाढत असल्यामुळे बीसीसीआयने असे पाऊल उचलले. या पार्श्वभूमीवर बांगलादेशातील हंगामी सरकार आणि बीसीबीने आक्रमक भूमिका घेताना आगामी ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी आपला संघ भारतात पाठविण्यास नकार दिला. ७ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या या स्पर्धेत बांगलादेश संघाचे तीन सामने कोलकाता, तर एक सामना मुंबई येथे नियोजित आहे.

सुरक्षेच्या कारणास्तव हे सामने श्रीलंकेत हलविण्याची बीसीबीने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडे (आयसीसी) विनंती केली, मात्र ती अमान्य करण्यात आली. त्यानंतर बीसीबीने आयसीसीला पुन्हा पत्र लिहिले आहे, परंतु कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व बाजूंनी विचार करण्याचे तमिमने बीसीबीला आवाहन केले आहे.

पाहिजेत
कॉम्प्युटर ऑपरेटर
ऑफिस असिस्टंट
मार्केटिंग एक्सिक्युटिव्ह
डिलीव्हरी पिकअप बॉय
पत्ता :- स्मार्ट कुरियर सर्व्हिस प्रा.लि. ऑफिस नं २४ विध्या कमरशियल कॉम्प्लेक्स सेक्टर ११, सी.बी.डी बेलापूर, मो. ९९३००२३५५२

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com